श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ३ रे.] चैत्र शके १८४७ [अंक १ ला.



संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ दर्नेर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

३१३

# अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... ३१५-३

स्फुट विषय ... ... ... ... १७५-१

श्री साईसच्चरित ... ... ... २२०-२


---

## विनंति

या मासिकाचें वर्ष चैत्रापासून सुरू असतें. हा शके १८४७ चैत्राचा अंक वर्गणीदारांचे हातीं पडत आहे तरीही अजून शके १८४ ची वर्गणी कियेकांची आलेली नाहीं. गेल्या फाल्गुनचे अंकांत आग्रह विनंती केली असूनही पुष्कळ वर्गणीदारांकडून शके १८४७ सा वर्गणी अजून आलेली नाहीं. तरी यापुढें वर्गणीदार आपापली व वेळेवर पाठविण्याची तसदी घेतील अशी उमेद आहे.

---

## वर्गणीचे दर

वार्षिक टपाल खर्चासह मनिआर्डरनें अगाऊ रु. ३।= व्ही. पी. रु. ३॥=, चालू अंकाची -।=, मागील अंक शिलक असल्यास -॥-.


## नोटीस.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणा यांच्या नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.

गोविंद रघुनाथ दाभोळकर.

श्रीसाईलीला ऑफीस. ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें. बी. बी. रेल्वे.

☞ या अंकांत आठ पृष्ठें जास्त दिलीं आहेत, तीं पुढील अंकां कमी करण्यांत येतील.



श्रीसांईबाबांची फिरण्याची जागा.

25-2-12.

I got up early, prayed, and saw Mr. Madhawrao Deshpande leave Shirdi for Nagpur. From there he will go to Gwalior for the wedding of Nanasaheb Chandodkar's son and will return by stages, seeing Benares, Allahabad, Gaya, Mathura and other holy places on the way. We held our Panchadashi class but Upasani was feeling unwell so our progress was slow. We attended the midday Arti and after the midday meal resumed our Panchadahsi class and made some progress. In the evening after the Wada Arti we attended the Shej Arti and after it Bhishma read Dasa Bodha.

26-2-12.

I attended the Kakad Arti. Sayin Baba went to the Musjid without saying much. The Nasik ladies went away this morning. Then we held our class and saw Sayin Baba go out and again after he returned to the Musjid. He told a story about his brother having misbehaved once, and being outcasted in consequence. Sayin Baba looked after him and eventually had him re-admitted to the caste. The midday Arti passed off as usual and after the midday meal I lay down for a while and then we continued our Panchadashi class. One Mr. Datar has come from Poona with his son who appears to be a pleader. They are staying in the hall. We attended the Musjid to see Sayin Saheb at the stroll. After the Wada Arti there was Bhagwat and Dasabodha and Bhajan in which Mrs. Kauajalgi and Sonubai assisted.

27-2-12.

I got up as usual, prayed, and held our Panchadassi class. For once we missed Sayin Baba going out and were not able to see him tillhe was on his way back. When I went to the Musjid at about 11 A. M., Sayin Baba said that he walked through a field in which there were very big parrots. The parrots were scared away by his presence and he stood long admiring their sizes and colour. The midday Arti passed off as usual and after meal I lay down for a while and then resumed our Panchadassi class till nearly night

fall when we went to see Sayin Maharaj at his evening stroll. At night there was the wada Arti and then the Sej Arti. Bhishma read Dasbodha and Bhagwat.

28-2-12.

I attended the Kakad Arti and was on my return praying when Dhondodaba arrived from Poona. He returned recently from Burma and I sat talking with him about the health of my friend Tilak and the state of his mind. It is as good as it can be under the circumstances. He wishes me to return to my practice at the bar but that depends upon what Sayin Saheb orders. We held our Panchadashi class and Mr. Balasaheb Bhate attended it. We saw Sayin Saheb go out and later on I went to the Musjid after he returned. He asked me if Jivamuni would pay. I could not make out what Jivamuni meant but replied that Jivamuni would if ordered. He said Jivamuni would not. He gave me a lot of fruits and sweets. The midday Arti passed off as usual. Today was Ekadashi and nobody except myself and Raghunath had a breakfast or the midday meal. Dhondo Baba also fasted. He returned to Poona at about 4 P. M., with Bhaoo son of Dada Kelkar. We then continued our Panchadashi class and in the evening went to see Sayin Maharaj at his stroll. He was in a very pleased mood, walked light, made jokes and so on. After the Wada Arti Bhishma read Bhagwat and Dasabodha.

एकदां नानासाहेब चांदोरकर कलेक्टर साहेबांबरोबर चिटणीस म्हणून फिरतीवर असतां दोन दिवसांची लागोपाठ सुट्टी आल्यामुळें साहेब मुंबईस गेले आणि नानासाहेब महाराजांचे दर्शनास आले. त्यांचे हाताखालची मंडळी दोन दिवस तेथेंच राहून तिसरे दिवशीं कोपरगांवचे स्टेशनावर जाणार होती आणि तेथेंच नानासाहेबही त्यांना भेटणार होते; आणि तेथून सर्व मंडळी बरोबर पुढील मुक्कामास जाणार होती. आणि तेथेंच साहेब-ही मुंबईहून परस्पर यावयाचे होते. असा संकेत ठरला असतांही महाराजांनी नानासाहेबांस नेमलेल्या दिवशीं जाण्यास परवानगी दिली नाहीं. एक दिवस जास्त ठेवून घेतलें. नानासाहेबांची महाराजांवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळें त्यांचे मनाची कांहीं चलबिचल झाली नाहीं. दुसरे दिवशीं महाराजांची आज्ञा मिळाली आणि नानासाहेब कोपरगांव स्टेशनावर गेले. आपली हाताखालील मंडळी आधींच पुढले मुक्कामीं गेली असली पाहिजे असें साहजिक नाना-साहेबांस वाटलें. पण स्टेशनावर जाऊन पाहतात तों ती सर्व मंडळी त्यांना तेथेंच दिसली. त्यांनीं मंडळींना म्हटलें, "तुम्ही काल कां गेला नाहीं ? मला महाराजांनीं ठेऊन घेतल्यामुळें माझा इलाज नव्हता. पण तुम्ही जावयास पाहिजे होतें. आपण कोणीही नसल्यामुळें साहेब रागावले असतील." त्यावर मंडळींनीं उत्तर दिलें ' साहेबांकडून तार आली आहे कीं, मी एक दिवस उशीरा येणार आहे तर आफिसच्या मंडळींनीं दुसरे दिवशीं नेमलेल्या मुक्कामावर हजर व्हावें." अर्थात् महाराजांनीं ठेवून घेतलें तें अगदीं योग्य होतें, हें नानासाहेबांस पूर्ण पटून आनंद झाला.

एकदां एक पंढरपूरचे वकील महाराजांचे दर्शनास आले होते. येथें कांहीं मुक्काम करून मग एके दिवशीं त्यांनीं जाण्याची परवानगी मागितली. त्या दिवशीं त्यांना जाणें अवश्य होतें, कारण दुसरे दिवशीं कोर्टांत त्यांचा एक महत्वाचा खटला असून, त्यांत विरुद्ध बाजूनें पुण्याचे तेव्हांचे सरकारी वकील खानबहादुर डावर हे येणार होते. तरी पण महाराजांनीं त्या दिवशीं जाण्यास परवानगी दिली नाहीं. वकील साहेबांच्या मनाची तळमळ झाली पण महारा-जांचे आज्ञेशिवाय जाण्यास त्यांचें मन घेईना. मग काय व्हावयाचें असेल त

होवो असा मनाचा ग्रह करून ते राहिले. दुसरे दिवशीं महाराजांनीं जाण्यास परवानगी दिली आणि वकील साहेब निघाले. दौंडास पंढरपुरकडे जाणाऱ्या गाडींत बसावयास गेले तों तेथेंच त्यांना खानबहादुर डाबर भेटले. अर्थातच आश्चर्यचकित होऊन वकील साहेबांनीं खानबदुरांस म्हटलें "आपला खटला काल होता असें असून आपण आज कां जातां ?" खानबहादुर म्हणाले "मला पुण्यास सरकारी काम होतें म्हणून मी पंढरपूर कोर्टाकडून तारेनें एक दिवसाची मुदत मागून घेतली." अर्थातच वकील साहेबांस महाराजांच्या सर्वज्ञतेचें कौतुक वाटलें आणि फार आनंद झाला.

## श्री. हरि सीताराम दीक्षित यांस आलेला महाराजांचा अनुभव.

मुंबई हायकोर्टांत डॉ. कुंटयांच्या बायकोनें केलेल्या मृत्युपत्रासंबंधानें माझी साक्ष व्हावयाची होती. खटला ता. ६ फेब्रुवारी १९१६ला नेमला होता व वादीचे सालिसिटर मेसर्स मेहता व दलपतराम यांनीं मला कांहीं दिवस अगाऊ वरील तारीख कळविली होती. मी महाराजांजवळ मुंबईस जाण्यासाठीं परवानगी मागितली पण महाराजांनीं ती दिली नाहीं. सातव्या तारखेस सकाळीं मि. दलपतराम येथें आले. त्यांनीं मला सांगितलें "आम्ही तुमची काल वाट पाहिली पण तुम्ही आला नाहीं. तुमच्या साक्षीची अत्यंत आवश्यकता आहे आणि म्हणून आमच्या ब्यारिष्टरांनीं मुद्दाम मला तुम्हाला मुंबईस नेण्यासाठीं पाठविलें आहे." मी म्हटलें "महाराजांनीं आज्ञा दिली कीं मी मुंबईस येण्यास तयार आहें.' मग आम्ही दोघेही महाराजांकडे गेलों. महाराजांना हकीगत कळविली आणि परवानगी विचारली. महाराज म्हणाले " सकाळीं पाहूं." दुसरे दिवशी सकाळीं मि. दलपतराम परवानगी मागण्यास गेले. त्यांना महाराज म्हणाले "दुपारी जा." त्यांनीं विचारलें "दुपारी मजबरोबर दीक्षितांना पाठवाल ना ?" त्यावर महाराज म्हणाले, "तो मागाहून येईल आणि तुलाही दुपारीं जाण्याची जरूरच आहे असें नाहीं. तुला वाटल्यास तूं जा" त्यांना महाराजांच्या या बोलण्याचें आश्चर्य वाटलें. कारण खटल्या दुसरे दिवशीं म्हणजे गुरुवार ता. ९ रोजीं सुनावणीस अवश्य

निघेल अशी त्यांची खात्री होती. दुपारीं त्यांनी निघण्याची तयारी केली आणि गाडींत बसणार इतक्यांत मुंबईची एक तार त्यांना मिळाली. त्यांत लिहिलें होतें कीं खटला ता. १३ पर्यंत तहकूब ठेवला आहे. अर्थात् महाराजांच्या वाक्याची सत्यता त्यांना तेव्हां पटली. त्यांनी आपल्याबरोबर साक्षी समन्स आणिले होतें आणि जातांना तें मला त्यांनी दिलें आणि मला बजाविलें कीं " कसेंही करून ता. १३ चे सकाळपर्यंत मुंबईस येऊन पोंहचा. तसें न झालें तर वारंटाचा अर्ज करणें भाग पडेल. तर असा प्रसंग मजवर आणूं नका ". मी सांगितलें, "महाराजांची परवानगी झाली कीं मी येतों." ता. ११ रोजीं मि. दलपतरामकडून सूचनार्थ पत्र व तार आली. मी परवानगी मागितली त्यावर सकाळीं पाहूं असें उत्तर मिळालें. दुसरे दिवशीं म्हणजे ता. १२ रोजीं पुन्हां एक तार व पत्र येऊन पोहोचलें. महाराजांनीं त्या दिवशींही परवानगी दिली नाहीं. तशीच ता. १३ लाही दिली नाही. ता. १४ चे सकाळीं मात्र जाण्याची परवानगी दिली, आणि मी मुंबईस त्या दिवशीं रात्रीं जाऊन पोहोचलों. पण त्याचें आधीं म्हणजे दुपारीं एक वाजतां मी शिर्डीहून निघून मनमाडास आल्याची तार मि. दलपतरामचे हातांत पडली. चमत्कार हा कीं खटला ता. १३ चे पाटीवर असून पुकारण्यांत आला नाहीं आणि ता. १४ रोजीं सुद्धां माझी तार पोचल्यानंतर सुमारे दोन तासांनीं पुकारला गेला. मजवर वारंट मागण्याची कडेकोट तयारी मि. दलपरामच्या बाजूनें केली होती पण तो अर्ज करण्याची संधीच महाराजांच्या कृपेनें त्यांना मिळाली नाहीं. याही पेक्षां ज्यास्ती महत्वाचा चमत्कार म्हटला म्हणजे वारंटापर्यंत मजल येण्याचीं चिन्हें दिसत असतांही महाराजांनीं माझ्या मनाची गडबड होऊं दिली नाहीं.

## रा. रा. हरि सीताराम दीक्षित यांस त्यांचे एका मित्राकडून आलेल्या ३-१-२५ चे पत्रांतील उतारा.

आपल्याकडून आलेलें पत्र व श्री साईबाबांची उदी पोंहोंचली. रोज नित्य नेमानें घेतों.

माझा धाकटा मुलगा टायफॉईडनें आजारी होता. माझ्या कुटुंबानें श्री साईबाबांपुढें दिवे लावून मुलगा बरा झाल्यावर श्रींकडे दिव्यासाठी पांच रुपये पाठवीन म्हणून नवस केला होता. श्री साईबाबांच्या कृपेनें मुलगा बरा झाला; करितां या सोबत पांच रुपयांची नोट पाठवीत आहे. करितां योग्य व्यवस्था मेहरबानीनें करितील.

## Copy of a letter dated 16 January 1925 from a friend of the Hari Sitaram Dikshit.

Dear Sir,

I think I have not yet gone out of your memory. Last time I met you in train and you were pleased to give me a photo of साई साहिब and also some भबूत. I was very much helped in my troubles and since I have been carrying the photo and the भबूत with me and invoke the blessings of साई साहिब. Accidentally today I happened to talk of the benefits of the भबूत to one of my most intimate friends who is now residing here.

His son-inlaw is suffering from certain troubles of lugns and lever &c. He had been under the treatment of several Doctors and is at present being treated by the best homeopathic Doctor at Calcutta. Personally I am very much interested in the patient and to tell you plainly I have an equal affection for him as I have for my own son-in-law. He is in troubles since over a year. All of a sudden it came to my mind to send the photo and भबूत to the patient at Calcutta, and they are therefore being sent to him now.

I request you to kindly send me at least 4 photos ( 3 small size as you carry with you and one bigger which can be kept in the house ) for my use. Please also send me some भबूत and give instructions to be sent to the patient. I am confident that through the blessings of साई साहिब he will be cured for which I shall be extremely grateful,

## श्री सद्गुरु सांईनाथ प्रसन्न

शिर्डी येथील श्री सांईनाथ संस्थानची निरंतरची व्यवस्था करण्यासाठीं अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टानें एक स्कीम ( म्ह. योजना ) मंजूर करून ती योजना अमलांत आणण्यासाठीं "शिर्डी संस्थान कमिटी" या नांवांची कमिटी नेमली आहे. ज्या कमिटींची आरंभींच्या ३ वर्षांची मुदत पुरी होऊन नियमाप्रमाणें चैत्र शके १८४७ पासूनच्या तीन वर्षांकरितां खालील ट्रस्टी म्हणजे:—

१ रा. रा. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान. बी. ए. एल्. एल् बी ऑ. माजिस्ट्रेट. सांताक्रुझ.
२ „ „ लक्ष्मण गणेश महाजनी
३ „ „ रामचंद्र आत्माराम तर्खड, म्यानेजर व सेक्रेटरी खटाव मकनजी मिल्स.
४ प्रो. गणपतराव जी. नरके. पुणें ( कॉलेज ) एंजिनिअरिंग.
५ रा. रा. तात्या गणपत पाटील कोते राहणार शिर्डी.


हे खेरीज करून बाकीच्या भक्त मंडळांकडून खालील जे १० गृहस्थ निवडण्यांत आले आहेत त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें: —

६ रा. रा. हरि सीताराम दीक्षित राहाणार पार्ले.
७ „ „ गोविंद रघुनाथ दाभोळकर,पेनशनर रेसिडेंट म्याजिस्ट्रेट वांद्रे
८ „ „ बाळकृष्ण विश्वनाथ देव. बी. ए. ठाणें.
९ श्रीमंत केशवराव गोपाळ बुटी. मु॥ नागपुर सिताबर्डी.
१० रा. रा. रामचंद्र दादा पाटील कोते मु॥ शिर्डी.
११ ह. भ. परायण गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणु महाराज.
१२ रा. रा. रघुवीर भास्कर पुरंदरे, राहाणार वांद्रे.
१३ „ „ माधवराव बळवंत देशपांडे मु॥ शिर्डी.
१४ „ „ मेघःशाम भगवंत रेगे. बी. ए. एल्. एल्. बी वकील, खांडवा.
१५ „ „ यशवंत जनार्दन गाळ्वणकर बी. ए. मु॥ वांद्रे.

## थोडेसें आत्मनिवेदन.

" श्री साईलीला" जन्मल्याला दोन वर्षें पूर्ण होऊन तिला आतां तिसरें वर्ष लागलें. "लीला" हें श्री समर्थ सांई महाराजांचेंच अपत्य. त्यांच्याच इच्छेनें इचा जन्म झाला. जन्मदात्री या अर्भकाची शक्य ती जोपासना करीत आहे. पित्याचें कृपाछत्र तिच्यावर आहे, पण या बालिकेनें जर श्री सांईनाथ महाराज विद्यमान असतांना जन्म घेतला असता तर तिचें संगोपन यथासांग झालें असतें व तिच्या संबंधानें आपलें कर्तव्य काय आहे याची जाणीव महाराजांच्या भक्तांना करून देण्याची आम्हांला जरूर पडली नसती. परंतु महाराजांची इच्छा म्हणा किंवा, योगायोग म्हणा, तिचा जन्म महाराज समाधिस्थ झाल्यानंतर झाल्यामुळें तिच्या संगोपनाचा भार महाराजांच्या भक्तमंडळावर येऊन पडला. कदाचित् महाराजांचीच इच्छा अशी असूं शकेल कीं, आपण देहधारी असतांना जे हजरो मुमुक्षुजन आपलेकडे येऊन कांहींतरी सेवा आपले हातून घडावी व महाराजांच्या बोधवचनांचा व कृपामृताचा प्रसाद आपणांस मिळावा म्हणून सरसावत असत त्यांपैकीं किती मंडळी आपण हा स्थूल देह सोडल्यावर आपली आठवण ठेवितात, हें मुकाट्यानें पहावयाचें. निदान आमची तरी अशी ( ठाम ) समजूत आहे. या दृष्टीनें महाराजांचे भक्तांनीं जर विचार केला तर त्यांनाही आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येणार नाहीं असें नाहीं.

वास्तविक पहातां महाराजांकडे येणाऱ्या मुमुक्षुजनांची संख्या अगणित होती, असें आम्हीं म्हटलें तर त्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. सरसकट रोज २०।२५ मंडळी नवी येत असत. हा क्रम कित्येक वर्षें चालला होता. दर्शनास येणारी बहुतेक मंडळी कांहीं ना कांहीं हेतूनें येत असत व या सर्वांची मनीषा महाराज पूर्ण करीत असत. सर्वांना निरनिराळ्या प्रकारचे अनुभव येत असत. या शिवाय कित्येक मंडळी आपलें तन-मनधन सर्वस्वी महाराजांचें चरणीं अर्पण करून महाराजांचें सन्निध स्थायिक होऊन राहिली होती ती निराळीच. या मंडळींना तर महाराजांची लीला



शिर्डी येथील रामनवमीचे यात्रेचा देखावा.

पदोपदी पहाण्यास व अनुभवण्यास सांपडत आहे. या दोन्ही प्रकारच्या मंडळींनीं जर आपल्याजवळील महाराजांच्या अनुभवांचा सांठा खुला केला तर महाराजांची केवढी मोठी सेवा केल्याचें श्रेय त्यांना मिळेल. आपले अगदीं अंतस्थ अनुभव असतील ते वगळून प्रसिद्ध करण्यासारखा पुष्कळ मजकूर असणें शक्य आहे. परंतु ही भक्तमंडळी ते अनुभव आमचे-कडे लिहून पाठविण्याचे मनावर घेतील तेव्हां आम्हांला त्याचा उप-योग होणार. महाराजांनीं वेळोंवेळीं जे अनुभव दिले ते गुल्दस्तांत ठेवण्या-करितां खास नव्हते. महाराजांचा अवतार " पुनरपि सुवाटेंप्रती लावण्या जगा" या उदात्त तत्त्वावर झालेला होता. ते देहधारी असतांना त्यांनीं मंगल-कार्य करावयाचें तें केलें. पुढील कार्यभाग त्यांनीं आपल्या भक्तमंडळावर सोंपविला; ही पूर्वपरंपरा आहे.

श्री विठोबाराय पुंडलिकाचें निमित्य करून चंद्रभागातटनिवासी होऊन राहिले खरे, परंतु पुढील कामगिरी श्री तुकाराम महाराज, नामदेव महाराज वग़ैरे संतांनीं केली. त्यांनीं आपले अनुभव प्रगट करून आज लाखों मुमुक्षु जनांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखवून दिला आहे. तसेंच श्री समर्थ रामदास स्वामींचें उदाहरण घ्या. समर्थांनीं मोठा शिष्यवर्ग निर्माण करून देह ठेविला. त्यांच्या शिष्यवृंदांनीं आपल्या स्वामींची महति सर्व महाराष्ट्रभर गाऊन मुमुक्षुजनांत आपल्या गुरुविषयीं भक्ति व प्रेम उत्पन्न केलें व त्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखवून दिला. देव व संत आणि गुरु व शिष्य यांची परंपरा अशी आहे.

ही परंपरा चालविली जावी म्हणून श्री साईलीलेनें जन्म घेतला. आपल्या सर्व गुरुबंधूंकडे ओवाळणी मागण्याचा तिचा हक्क आहे. तिची मागणीही इतकी अल्प आहे कीं, या लाडक्या बहिणीचें कोड कोणाही सहृदय बांधवाला पुरवितां यावें. जीवनाकरितां फक्त महाराजांसंबंधीं आलेले आपआपाले अनुभव व वस्त्रप्रावर्णाकरितां वार्षिक रु. ३।=अथवा

[1] 'हें पूर्णब्रह्म सुखधाम' हें दासगणू महाराजांचें पद पहा. श्री साईलीला वर्ष १ अं. ११.

महिना ।-।। ची अल्प देणगी या शिवाय ती आपल्यापाशी दुसरें कांहीं मागत नाहीं. तेव्हां आपण या आपल्या प्रिय भगिनीचे एवढे लाड पुरविणार नाहीं काय ?

तिला आतां तिसरें वर्ष लागलें. वयाच्या वाढीबरोबर तिच्या जोपासनेचा खर्चही सहाजिक थोडा वाढणार तो पुरा करण्याची जबाबदारी महाराजांच्या भक्तमंडळीवर आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे.

" श्री साईलीला" व्यक्तिविषयक फायद्याकरितां नाहीं. महाराजांचे गुण गावे, त्यांचीं बोधवचनें व त्यांच्यासंबंधीं भक्तवृन्दांना वेळोवेळीं आलेले अनुभव संकलित करावे, या साठींच लीलेचा जन्म आहे. यायोगें ज्या कोणा गृहस्थांना प्रत्यक्ष महाराजांचा समागम घडला नाहीं अशा मुमुक्षूंमध्यें महाराजांसंबंधीं प्रेम व भक्ति उत्पन्न होऊन त्यांना महाराजांच्या कृपेचा लाभ होतो. अशा तऱ्हेनें पुष्कळ गृहस्थ, कीं ज्यांना महाराजांचें नांव पूर्वीं ऐकूनही ठाऊक नव्हतें त्यांची महाराजांचे ठिकाणीं श्रद्धा बसून महाराजांची त्यांचेवर कृपा होऊन ते महाराजांचे निःसीम भक्त झाले आहेत.

गेल्या दोन वर्षांत महाराजांच्या ज्या भक्तांनीं आपआपले अनुभव आमचेकडे पाठविले त्यांचे तर आम्हीं आभारी आहोंतच, परंतु आमचे जे आश्रयदाते स्वतः महाराजांचे सांप्रदायी नसून आपला आश्रय कायम ठेऊन आम्हांला प्रोत्साहन देत आहेत त्यांचे अम्हीं फार आभारी आहोंत. दोन वर्षें झालीं तरी श्री साईलीलेची आर्थिक स्थिति असावी तशी झाली नाहीं. त्यामुळें आम्हीं योजिलेल्या सुधारणाही आम्हांला करतां आल्या नाहींत; तरीपण वेळोवेळीं आम्हीं बरीच छायाचित्रें दिलीं आहेत. चालू सालीं आम्हीं महाराजांची व त्यांच्या संबंधांची कांहीं दुर्मिळ छायाचित्रें देणार आहोंत. महाराजांचे कांहीं असे भक्त होऊन गेले, कीं त्यांच्या चरित्रापासून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. अशा भक्तांचीं चरित्रें आम्हीं या वर्षीं देणार आहोंत. आजपर्यंत खर्च पुरा भागण्याइतकीही स्थिति आलेली नाहीं.

म्हणून आमच्या वाचकांना आपल्या स्नेहीमंडळांतून निदान एकेक वर्गणीदार तरी आम्हांला मिळवून द्या, अशी आग्रहाची विनंति करून हे आत्मनिवेदन पुरें करितों.

महाराज हे मुळचे कोठील राहणारे आणि त्यांचें आईबाप कोण होते यासंबंधानें विश्वसनीय हकीगत कोणीच सांगूं शकत नाहींत. निरनिराळे लोक निरनिराळ्या कल्पना करतात, पण अजून निश्चयात्मक अशी हकीगत कळली नाहीं. मात्र शिर्डीचे म्हाळसापती असें म्हणत असत, कीं महाराजांनीं आपल्याला स्पष्ट सांगितलें होतें कीं, मी पाथरीचा ब्राह्मण असून, लहानपणीं माझ्या आईबापांनीं मला एका फकिराला देऊन टाकलें होतें. ही हकीगत महाराजांनीं म्हळसापतीस सांगितली त्याच सुमारास पाथरीचा एक गृहस्थ कोऱ्हाळ्यास कांहीं कामासाठीं गेला होता व तो परत जातांना शिर्डीस आला. त्यावेळीं महाराजांनीं त्याच्याजवळ पाथरी येथील बऱ्याचशा मंडळींचीं नांवें घेऊन चौकशी केली.

महाराज शिर्डीस प्रथम आले तेव्हां त्यांचा पोषाख भगवी कफनी. भगवी टोपी आणि भगवें धोतर असा होता, असें म्हळसापती सांगत असत. नंतर काशिराम शिंप्यानें हिरवी कफनी आणि हिरवी टोपी शिवून दिली ती ते घालीत असत. नंतर कांहीं दिवसांनीं पांढरी कफनी घालूं लागले आणि डोक्याला धोतर बांधूं लागले. महाराजांच्या उशाला नेहमी एक लहान गाठोडी असे; ती त्यांच्या देहावसानानंतर सोडली तेव्हां त्यांतून एक हिरवी कफनी व हिरवी टोपी निघाली. ती गाठोडी संस्थानांत जपून ठेवली आहे.

महाराज पुष्कळदां लहरींत येऊन गाण्याची तुटक कडवीं म्हणत आणि तीं फार गोड लागत; पण महाराज पद्धतशीर भजन म्हणतांना किंवा गाणें गातांना ऐकण्याचा सुयोग अलीकडे तरी निदान कोणास लाभत नसे; पण हा सुयोग माझ्या एका मित्राला एकदां लाभल्याचें त्या मित्रानें

मला सांगितलें. हे मित्र भजन फार प्रेमळपणाचें करतात. ते महाराज देहधारी असतांना शिर्डीस पुष्कळदां येत असत; आणि चारआठ दिवस राहतही असत. एकदां महाराज चावडींत असतां तेथील शेजारतीचा नित्यक्रम आटपून मंडळी घरोघर गेल्यानंतर महाराजांनीं या मित्रास बोलाविलें आणि भजन करावयास सांगितलें. त्यांचें भजन कांहीं वेळ ऐकल्यानंतर महाराज म्हणाले, "आतां आम्ही भजन करतों तें तुम्ही ऐका." असें म्हणून महाराजांनीं सुरवात केली आणि सुमारे एक तास अप्रतिम भजन केलें. अशा तऱ्हेचें भजन माझ्या मित्रानें पूर्वी कधीं ऐकलें नव्हतें आणि त्यानंतरही कोणाकडून इतकें सुंदर भजन त्याच्या ऐकण्यांत आलें नाहीं. महाराजांच्या भजनापासून माझ्या मित्राला खराखरा परमानंद झाला हें सांगणें नकोच.

**श्री साईलीलेच्या या वर्षाच्या ९ वे अंकांत वर्णन केलेल्या श्री समर्थ सद्गुरु साईबाबांचे शिर्डी येथील ६ वे म्हणजे शके१८४६ चे पुण्यतिथीचे उत्पन्नाचा हिशेब.**

### जमा

६ व्याज रा. निळकंठराव सहस्रबुद्धे यांनीं दिलेल्या नोटीचें.

९२०।॥. वर्गणी.

५८।-. भिक्षा पुण्यतिथीचे दिवशीं शिर्डी गांवांत मिळाली ती.

९८।॥≈।॥.श्रीचे समाधीपुढील पेटींत व मशीदींतील पेटींत उत्सवाचे पांच दिवसांत दक्षिणा आली ती.

१०३०.।॥-

### खर्च

२ प्रसादासाठीं लेवल खरेदी

६ आमंत्रण कार्डाची छापणावळ

.।॥. निशाणांसाठीं रंग

९॥= आचाऱ्याचें रेल्वे भाडें

२४ आचाऱ्याचा पगार

१॥≈ मुंबईहून पाठविलेल्या सामानाबद्दल हमाली

२१ गलेफास कापड

१५ श्री मारुतिबुवांस दिले

५ सोपान यांस दिले

१७॥।-।. देवस्थानाचे सामानाबद्दल

२१ आमंत्रण पत्रिकांचें पोस्टेज

२१ प्रसाद पाठविण्यास पोस्टेज

३।- किरकोळ

६॥। बैलगाडी भाडें

२०॥।= तेल गोडें व राकेल

१ घोडयाची ओवाळणी

५ वाजेवाले यांस दिले

११ खैरात वाटली

३ तीन कफन्या करवून दिल्या त्यांची शिवणावळ

४८= किरकोळ मजूरी

८।-।.दक्षिणा,जानवी,पुजाखर्च वगैरे

३०।- मोगलाई रुपये२२१ आले त्यांबद्दल वटाव.

३४८.।.॥। भोजन खर्च

५८६॥।=॥.

४४३॥।=॥ शिल्लक

१०३०.।॥-

पद ( चाल—रामा गजला. )

सांई माते धांवत येई उचल तुझ्या बाळिला ॥

वस्त्र अंगेंही चिखलें भरलीं ॥
नाकीं तोंडीं धूळ जहाली ॥
तुज म्हणती हे लेंकुरवाळी ॥
हंसतील जन हे तुला ॥ १ ॥ सांई० ॥

पायांमध्यें शक्ति न पाही ॥
बोल बोबडे उमटत नाहीं ॥
काय हवें तें नकळे आई ॥
रडूनी जीव दमला ॥ २ ॥ सांई

जिवाचा हो अट्टाहास ॥
सांग कुणाची करणें आस ॥
जन म्हणती तुज माता दक्ष ॥
मग कां हें योग्य तुला ॥ ३ ॥ सांई

अंगडें टोपी गेली कोठें ॥
नाकीं तोंडीं शेंबूड लोटे ॥
जग हंसते हें तुज उफराटें ॥
लाज न त्याची मला ॥ ४ ॥ सांई

पुत्राचें तें कौतुक करसी ॥
कन्या म्हणूनी कां अवगणसी ॥
मातृस्नेहा काय विसरसी ॥
योग्यची हें का तुला ॥ ५ ॥ सांई० ॥

लोक म्हणती हे कन्या कोण ॥
कोण कुणाची अशी का दीन ॥
काय असे हें माता मन ॥
लांछन हें ना मला ॥ ६ ॥ सांई० ॥

" कोणीतरी "

रा. रा. श्रीसाईलीलाकर्ते यांस:—

कृ. शि. सा. न. वि. विशेष. आपल्या सर्वांगसुंदर भक्तिरसानें ओतप्रोत भरलेल्या श्रीसाईलीलेच्या पुढील अंकांत खालील पदास स्थळ द्याल अशी आशा करितें.

खालीं लिहिलेलें पद कै. नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर ह्यांनीं श्री साईबाबांच्या करितां मुद्दाम रचून आम्हांस लिहून दिलें होतें. तर आपण तें श्री साईबाबांच्या भक्तमंडळाकरितां आपल्या मासिकांत प्रसिद्ध कराल अशी माझी सविनय प्रार्थना आहे.

## पद.

धन्य धन्य हा दिन अजिचा ॥ हो धन्य धन्य हा ॥ धृ० ॥

आगमनानें कीं अपुल्या[१] या ॥
कमलनयन जगतात भेटला मज साचा ॥ धन्य धन्य हा ॥ १ ॥

महापुनित तें तट गोदेचें ॥
शिर्डी म्हणती ज्या ग्रामातें ॥
निवास स्थल तें गुरुरायाचें ॥
जेथ वसे सांईनाथ ॥
विसावा मम जीविचा ॥ धन्य धन्य हा ॥ २ ॥

भाई जिवनजीची गल्ली, ठाकुरद्वार
मुंबई ता. २५।२।२५

आपली नम्र,
येशवंतबाई श्रीकृष्ण नवलकर.

---

१ श्रीसाईच्या.

कवितावद्ध श्री. संतनामदेवचरित्राचे कर्ते व नांदेड येथें प्रसि[द्ध] होणाऱ्या आख्यान रत्नमालेचे संपादक श्री. देवीदास लक्ष्मण महाजन यांजकडून

## साशंकित शारदा !

[ संतकवि दासगणू यांचे चरणीं नम्र विनंती ]

### आर्या.

भूवैकुंठीं ठेउनि नश्वरसा मर्त्य मानवी काय
काळें ओढुनी नेलें ' दामूअण्णास ' शेवटीं काय ? १

गेले ' दामूअण्णा ' नच, तुमचा पुत्र पोटचा गेला
केला भग्न मनोरथ, कर उजवा तोडुनी तयें नेला २

स्वरमाधुर्य गुणास्तव दैन्यांतुनि जो समूळ काढविला
त्यजिला तुम्ही प्रपंचहि, परि उलटा तत्प्रपंच वाढविला ३

झाले कष्ट तुम्हा जे ते सारे तन्मुखें मला कळलें
त्यांचेंहि चित्त तिळभर तुमच्या पदसेवनांत ना चळलें ४

श्रीहरिकीर्तनरंगीं अनुपम तुमचीच पाहिली जोडी
परि आपल्या स्वभावें अदयपणें काळ हा तिला तोडी ५

प्रेमळ, निरुपम, सुखकर, निःश्रेयस्करहि एक अंगाला
आतां मुकणार दिसे जनता तुमच्या कथा- प्रसंगाला ६

शतशां व्याख्यानांनीं जो का परिणाम अल्पसा न घडे
एकाच कीर्तनानें तुमच्या होतो, मला दिसे उघडें ७

करिती रसिक सुदज्जन कौतुक मम अल्प काव्य पाहून
कारण अन्य नसे त्या तुमच्या प्रिय काव्यकीर्तनाहून ८

परि मत्कृति जलकणिका, युष्मत्काव्योदधींतली खचित
मी प्रार्थना करावी नम्रपणें हें असे मला उचित ९

द्वारांत मंदिराच्या बसुनि यथामति जिच्या पदा सेवीं
साशंकिता दिसे ही आज महाराष्ट्र शारदा देवी ! १०

---

१ श्री. दासगणूचे शिष्य. कै. दामोदर वामन आठवले. २ दामूअण्णांच्या. ३. माझें दासगणूस अर्पण केलेलें नामदेव चरित्र.

होउनि अनन्य पुसतां हेतु तिनें[1] जो निवेदिला मजला
तो याचना स्वरूपें कळवाया नम्रदास हा सजला ११

माझा निवास भूमी संतकवींनींच शोभली सारी
माझ्या सेवेपुढतीं ज्यांना सुख वाटलें न संसारीं १२

मागें महीपतीनें गाजविला संतकीर्तिचा डंका
वाङ्मय तप त्यापरिचें कोण करिल हीच वाटली शंका १३

ऐशा खडतर काळीं कारण झालें असे महत्वाचें
जड संस्कृतिच्या पुढतीं उरलें नच नांव आत्मतत्वाचें १४

सांप्रत मज भोंवतिं ही माझी जो भक्तमंडळी जमली
शृंगार रसीं त्यांची वाणीसह वृत्ति सर्वदा रमली १५

मन्मंदिर जें होतें गजबजलें थोर थोर संतांनीं
गेलें भरूनी आतां प्रेमाच्या वैषयीक गीतांनीं १६

'सीना[2]' तटीं गणूनें लावणिची लावणी स्वयें केली
'फंदी[3]' किंवा 'जोशी[4]' जणुं यांनीं मांडिली पुनः केली[5] १७

'श्रीसाईबाबांच्या' योगानें योग हा असा जुटला
मनिं आशेचा अंकुर उत्तेजन-वारि-सिंचनें फुटला १८

त्यांनीं संतचरित्रें दासगणूकडुनि नित्य गावविलीं
प्रतिकृति महीपतीची जडसंस्कृतिच्या युगांत दावविली १९

परि कोसळला त्यांवरि सांप्रत जो का प्रसंग[6] दुर्धरसा
तो अग्नितुल्य घेइल वाटे शोषून काय काव्यरसा ? २०

कवितालतिका त्याची एकाएकीं अशी जरी सुकली
तरि मात्रवृत्ति माझी पुढतीं सच्चरित-संग्रहा मुकली २१

यापरि सरस्वतीचें झालें साशंक चित्त कविराया !
कोण तुम्हाविण सांगा या शंकेतें दुजें निवाराया २२

प्रॅल्हाद[7] तालधारी, रमती हरिकीर्तनीं शुकाचार्य
प्रल्हाद तुम्हां मुकला, झाला जरि का असाल हतधैर्य २३

---

१. शारदेनें. २. सीनानदी तटाकीं अहमद नगर प्रांतीं. ३ अनंतफंदी. ४ रामजोशी. ५. क्रीडा. ६. शिष्याचें निधन. ७. प्रल्हादस्ताल० इ. श्लोक पहा.

गेला तरि जाउंद्या-न म्हणे मी-हरिकथेंतला रंग
तद्भावीं नच होइल परि तितुका शारदा-मनोभंग २४

त्यागाल जरि चिपोळ्या वामकरांतिल तरी त्यजा, मात्र
सव्यकरीं राहूंद्या काव्यास्तव लेखणी अहोरात्र २५

न म्हणा लेखक नाहीं म्हणुनी ही लेखणी बसे स्तब्ध
प्रक्षुब्ध कां करितसा, कविता देवी तुम्हावरी लुब्ध २६

लेखक निजभाग्यें गुरू-काव्य विलेखनिं समर्पिती काय
परि कविकाव्यें असती अवलंबुनि लेखकावरी काय ? २७

'ज्ञानेश्वरी' लिहाया होता जरि शिष्य 'सच्चिदानंद'
'अमृतानुभव'-विलेखन तद्भावीं काय जाहलें बंद ? २८

वेडें पोर म्हणा मज परि माझा शब्द हा नका मोडूं
सेवा सरस्वतीची कांहीं झालें तरी नका सोडूं २९

—दे. ल. महाजन. नांदेड,

१. शरीर.

श्री. उद्धवेशबुवा यांनी श्रीक्षेत्रसिद्धनाथ ( नर्मदा नाभिस्थान नेमावर येथें गेला चातुर्मास संपल्यानंतर श्रीसमर्थ सद्गुरु साईनाथ महाराज यांची तसबीर पालखींत घालून श्रीसिद्धनाथ मंदिरापासून नेमावर गांवापर्यंत मिरवत नेली त्या प्रसंगाचें वर्णनात्मक पद:—

## श्रीनर्मदा नाभीक्षेत्र सिद्धनाथ.

पद. चाल—( अजी अक्रुर हा )

भो सांई गुरु अद्भुत तव हीं करणी । हा श्याम लागे चरणी ॥
तव मूर्ति मला सिद्धनाथिं हीं दिसली । ही धन्य केलीस धरणी ॥
चाल बदलुन—मी अपत्य तव किंक र ( रे ) सभोंवार भक्तपरिवार ( रे ॥ )
घेतसें नाम तव सार ( रे ) तव मूर्तीला पालखींत घालोनी ॥
आणिलें व्यास पुत्रांनीं । भो साई गुरु ॥ १ ॥ ५ ॥
भाव सुमनें हीं ओवाळुनी तुजवरतीं । दशदिशा सुगंधित होती ॥
तव नामाचा घोष भक्त कंठांनीं // गाति तें पूर्ण प्रेमांनीं ॥
त्या सदनाला नाम तुझें ठेवोनी । आणिलें स्वरूपा ध्यानीं ॥

---

१ अगाध. २ उद्धवेश ३ घेतसे नाम तव चांगरे असेंही वाचणें. ४ वयोवृद्ध भक्तवर्य नारायण गोविंद व्यास ठाणेदार साहेब नेमावर व त्यांचें जेष्टपुत्र दत्तात्रय नारायण व्यास=पितापुत्र उभयतां मास पूर्ण साह्यकारी झालेले.५ भाव अगर भक्ति हींच फुलें=बाकी पालखीचे वेळेस झेंडू सेवंती, गुलाब व इतर फुलेही पुष्कळच होती व ती भक्त मंडळींनी सुर्प रत्यांभर मोठे प्रेमानें पालखीवर रधळलीं. ६ भजन, नामस्मरण. ७ मोठ्या प्रेमळ भाव भक्तींनें. ८ यंदाचा चातुर्मास ज्या जागेवर कुटींत झाला त्या कुटींत आतां कोणी योग्य असेल तरच राहील. ती जागा श्रीसिद्धनाथाचे महंत वयोवृद्ध सात्वीक महाराज यांचे मालकीची आहे व ती आतां श्री साईकोठी अगर श्रीसाई सिद्धनाथ कुटी या नावानेंच प्रसिद्ध झाली आहे व तेथें श्रीच्या फोटोची पूजा होत जाईल असी महंतानीं विनंती केली व तेथें निशाण भगवें श्रीचें नांवें लावलें गेलें आहे. रोज आरती पूजा होते. इतर वेळेस नेहमीं कुलूप असतें. ९ श्री साईनाथबाबांचें स्वरूप.

चाल बदलुन—मार्गेंयां भक्त महंत (हो)॥ जो सिद्धनाथ अर्चित हो
त्या करीं बैसुनी जात ॥ हो ।)
मो विशाल जें पूज्य लिंग त्यां स्थानीं।
बैससी गर्भ गृह धरूनीं ॥ भो साई ॥ २ ॥

त्या समयाला हृदय कसें हें भरूनी ॥
बाष्प तें दाटलें नयनीं ॥
तें प्रेम कसें वर्णू कवणें वाणी ॥
हें एक जाणती ज्ञानी ॥
चाल बदलुन—वस्त्र त्यां करीं घातीलें। (रे ॥)
जें बहुमोलें गुंफिलें (रे ॥)
त्यां वस्त्रानें सजविलें (रे ॥)

---

१ पालखीचे मीरवणुकीचे वेळेस रस्त्यानें २ श्रीमंत भक्तवर्य वयोवृद्ध श्रीसिद्धनाथ नेमावरचे साधू महंत ब्रह्मचारी गोसावी माहाराज श्रीसिद्धनाथलींग ३ श्रीसिद्धनाथाची पूजा व चढाई व मालकी हक्क असे हे संस्थान पेशव्यापासून ७ गांवे इनाम व ९०० रुपये नेमणूक होती. पण तूर्त ती होळकर सरकारांनी जत केली आहे व वेतन ७ गावें ही पूर्ण मिळत नाहीं—कालगती. श्रीकृपेंने या धर्माकडे सरकार होळकरांचे कृपेनें लक्ष जावें. ४ त्या महंत माहाराजांचे ओटींत( ओंजळींत )हातांत ५ श्रीसिद्धनाथाचें जें मंदीर आहे तें पांडवांचे वेळचें आहे असी दंतकथा आहे पण—असें दगडी सुबक देऊळ मांझे ४ धाम यात्रेंत २।४ ठिकाणींच पाहण्यांत आलें व हें सिद्धनाथलिंग सनत् कुमार यांचे हस्तें स्थापिलेलें असून श्री नर्मदा नदीचें नाभीक्षेत्र—-मध्यक्षेत्र प्रसिद्ध आहे.

६ गाभारा, शिवाचे लींग, गर्भगृह, देवळाचे आतला भाग. ७ प्रेमाश्रु. ८ डोळ्यांत. ९ अनुभवी. १० भरजरीची शालजोडी.

ह्या देहाला व्यर्थ मान देवोनी
साधु[1] तो ध्वजा[3] घेवोनी[4] । भो सा. ॥ ३ ॥

भो साई गुरु अद्‌भूत तव ही करणी ॥
हा शाम लागे चरणीं ॥ ध्रु० ॥

## ॥ श्री सद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

श्री सद्गुरु सांईबावांचे पुण्यतिथी निमित्त विजया दशमी ता. ७ अक्टोबर सन १९२४ रोजीं पुणें शहरीं रा. रा. काशिनाथ शंकर डुबे यांजकडे श्रींचे जुन्या व नव्या भक्त मंडळींनीं भंडारा साजरा केला. रा. रा. डुबे यांनीं संदर प्रसंगीं फार उत्तम व्यवस्था ठेविली होती. दुपारीं श्रीची मोठ्या थाटानें पूजा आरती वगैरे समारंभ फार बहारीचा झाला. व श्रीचे भक्तमंडळीस प्रसाद मिळून गोर गरीब, अनाथ, आंधळे, पांगळे, फकीर वगैरे यांनांही श्रीचा प्रसाद वाटण्याचें काम सदरील दिवशीं रात्रौ ११ वाजेपर्यंत झालें; रात्रौ आणखी श्रीचे भक्त प्रसादासाठीं येऊन प्रसाद घेऊन गेले. नंतर श्रीची आरती भजन वगैरे कार्यक्रम फारच थाटानें साजरा केला. सदर प्रसंगीं डुबे यांचे चिरंजीव रा. रघुनाथ यांनीं श्री सद्गुरु साई बाबांवर कांहीं तयार केलेलीं पदें म्हणून दाखविलीं तीं श्रीचे भक्तांचे माहितीकरितां खालीं देत आहें.

## पद १ लें:—

(चाल:—वरी जाऊरे)

देखो देखोरे भाई येही प्राण ज्योती ॥ ध्रु० ॥
अंडज स्वेद्‌ज उद्भिज सारो वामे पूर्ण भरो ॥
वोही पूर्ण ब्रह्म सनातन मूर्ती ॥ देखो ॥ १ ॥

---

१ उद्धवेशं अगर साईसुत शामदास. २ महंत महाराज. ३ निशाण, ४ मठांत घेऊन जाऊन मग तें निशाण कुटीवर लावलें.

पशु पक्षी और मनुजमो। सुंदर रूपसे भराये ॥
ज्ञानचक्षुसे देखो भाई, वोही आनंद मूर्ती ॥ देखो ॥ २ ॥

चंद्र सूर्य प्रकाशते है वोही स्वरूप यही है ॥
हुकमत जिनकी सप्त गोलपर छांडो अज्ञान कीर्ती ॥ देखो ॥ ३ ॥

माया जाल ये झूटा पसारा, समजा ववो विवेक द्वारा ॥
अज्ञान पट छांडके देखो वोही साई ब्रह्म मूर्ती ॥ देखो ॥ ४ ॥

गोदा तटके निकट बैठत है। सद्गुरु साईनाथ मोरे ॥
चरणा मृतकी आशा करके दास खडा वहु खंती ॥ दे० ॥ ५ ॥

## भजन.

जय जय साई नाथ बोला। मंत्र हा पहिला
दक्ष सदा जे राहती भजनीं त्यासी रक्षिल साई दयाघन ॥
तोची जगीं उरला ॥ मंत्र ॥

## पद २ रे

सगुण चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं।
सज्जन वृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥ ध्रु ॥
संत संगे अंतर रंगें नाम बोलावें
किर्तन रंगी साई संनिध सुखें डोलावें । सगुण ॥ १ ॥
भक्ति ज्ञाना विरहित गोष्टी इतरा न कराव्या ॥
प्रेमभरें वैराग्याच्या युक्ती विवराव्या । सगुण ॥ २ ॥
जेणें करुनी मूर्ती ठसावी अंतरीं श्रीसाईची।
ऐसी कीर्तन मर्यादा हे संतांचे घरची ॥ सगुण ॥ २ ॥

अद्वय भजनें अखंड स्मरणें वाजविता टाळी ।
गुरुदास म्हणे मुक्ती होय प्राण्या तात्काळीं ॥ ४ ॥

## समाधिचें पद ३ रें.

सगुण स्वरुपाचा लोप जाहला अजि साचा ॥ धृ ॥

शके अठराशें चाळीस । आश्विन शुद्ध दशमीस ।
देह ठेविला सद्गुरु नाथें ॥ सगुण ॥ १ ॥

कैची मशीद आणि कट्टा । भणभणती दोन्ही वाटा ॥
रथ पालखी गेली लया ॥ सगुण ॥

प्रभुनाम तुम्हा साई । होसी आम्हां दीनांची आई ॥
संकट समयीं शरण जाऊं कवण्या ठायीं ॥ सगुण ॥

अभय कर ठेविला माझे डोई । त्रिभुवन व्यापक
हा साई । तेचि चरण माझे हृदयां ।
गुरुदास लीन तव पायीं । सगुण ॥ ४ ॥

## भजन.

मशीद झेंडा दुरून पाहिला । जय जय साईनाथ बोला ॥
देह भान तें विसरुनि गेलें मन गुंजारव करि चरणाला ॥
प्रथम दर्शनीं मूर्ति पाहिली आनंदें डोळा । जय जय साईनाथ बोला॥

श्री उद्धवेशबुवा यांनीं पाठविलेलें

## ॥ पद ॥

चाल:—( आनंद कंद ऐसा हा हिन्द देश माझा० )

सांई तुझ्याच पायां । निंत ठेवित डोई सखया ॥ ध्रु० ॥

तूं ईश मेघ जेवीं । समभाग सर्व पाही । जरि होय नीच काया ।
घेशीच अंकीं राया ॥ साई० ॥ १ ॥

ना भेद हिंदु यवना जरठी पशूंहिं जाणा । गोवोनि गूण नाना ।
हिंडेने भूवरिया ॥ २ ॥ सांई ॥

तूं ईश बुद्धीदाता । भक्तासी माय तातां । केलें सनाथ आतां ।
शामासी याच ठाया ॥ साई. ॥

---

टीप—अंकाचे स्पष्टीकरण:—

१ चरण. २ नेहमीं ( सदोदित ). ३ मस्तक ( शिर ). ४ हलकी जात ( अगर इतर वर्ण ) ५ मांडिवर. ६ वृद्ध ( म्हातारा ). ७ मुक्के प्राणी पश्वादिक. ८ अनेक. ९ फिरेन. १० पृथ्वीवर ११ आईबाप. १२ चांगलें ( आनंदी ). १३ ( साईलीला अंक २, वर्ष १ यांत स्पष्ट केलेले श्री उद्धवेश. १४ मु. सत्वासय नेमावर.

## अभिप्राय.

श्री नामदेव महाराजांचें काव्यमय चरित्र. लेखक:—ह. भ. प. देवीदास लक्ष्मण महाजन, नांदेड (प्रकाशक रा. विठ्ठल लक्ष्मण सुबंध, नामदेव छापखान्याचे मालक, ११७० मेन स्ट्रीट, पुणें. किंमत ५आणे.) लेखकानें हें पुस्तक आमचेकडे अभिप्रायार्थ पाठविलें त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोत. हें काव्यमय चरित्र लहानसें म्हणजे फक्त ५६ पानांचेंच आहे, परंतु त्यांतील काव्यमय मांडणी इतकी सुरस व हृदयंगम आहे कीं, तें स्वारस्य गद्यांत आणावयाचें झालें तर बराच मोठा ग्रंथ लिहावा लागेल. एकंदर चरित्राचे तीन खंड पाडले आहेत. पूर्वखंड, मध्यम खंड व उत्तर खंड प्रत्येक खंडांत नामदेव महाराजांच्या चरित्रांतील दोन दोन महत्त्वाचीं उपाख्यानें गोंविलीं आहेत. पूर्वखंडांत बाल्यावस्थेंत असतांना नामदेव महाराजांनीं श्री विठ्ठलाला आळवून त्यांचेकडून नैवेद्याचें दूध प्राशन करविलें हा एक प्रसंग व दुसरा तीर्थाटन करीत असतां महाराज हस्तिनापुरास गेले व तेथें कीर्तन चालू असतांना त्या काळचा यवन भूपति: जलालउद्दीन यानें महाराजांचें सत्व पहाण्याकरितां कीर्तनांत येऊन गोमातेचा वध केला व महाराजांनीं ४ दिवसाचे मुदतींत भक्तवत्सल गोपाल कृष्णास आळवून गोमातेला संजीव केलें असे हे दोन प्रसंग वर्णिले आहेत.

मध्यम खंडांत नामदेव महाराज पंढरीस परत आल्यावर त्यांचे कीर्तनांत गोरोबा कुंभार यांचे कापलेले हात पुन्हां फुटले व त्यांचें आमंत्रणावरून नामदेव, ज्ञानेश्वर वगैरे सर्व संतमंडळी तेरढोकी गांवांस गोरोबाचे घरीं गेली, व तेथें सर्व संतांनीं गोरोबास पुन्हां संसारांत घातलें. नामदेव हे महान संत खरे, त्यांचे भक्तिबळ फार मोठें होतें, परंतु " सर्व सिद्धता अशी असुनियां परिणामीं निष्फळ। ज्ञान बीज नच अजुनि पेरलें पहा कसा हा खुळा " असें त्यांच्याविषयीं उद्गार ज्ञानेश्वरांनीं गोरोबाजवळ काढिले व "यावी करूनी काका (गोरोबा) या प्रति याची जाणीव कळा। होईल जें दूर समूळची तळमळिची अवकळा " अशी त्यांना विनंति केली.

गोरोबानां तें पटलें व लगेंच त्यांनी आपली "थापटी" हातीं घेऊन "अप
घटाची" परिक्षा करण्याकरितां सर्व संतांचीं डोकीं तपासून पाहिलीं
नामदेवांना गुरुप्रसाद झाला नसल्यामुळें त्यांचा "घट अपक्व ठरविला"
नामदेव श्री पांडुरंगाचे लाडके. प्रत्यक्ष श्री पांडुरंग त्यांच्याशीं बोलत अस
तेव्हां अर्थात त्यांना गोरोबाच्या या कृतीचा विषाद वाटला व गोरोबा
ठासून उत्तर दिलें कीं:—

प्रभुच्या पुढती अन्य कुणाची, महति स्वीकरितां ॥
तत्स्मरणाविण आयुष्याचा, क्षणहि न जाय रिता ॥
अपक्व म्हणतां विचार आधीं, केला कां पुरता ॥

व रागारागानें पंढरीस श्रीपांडुरंगाकडे गाऱ्हाणें घेऊन गेले. देवांनीं नाम
देवांची समजूत घातली व त्यांना

'नागनाथ-मंदिरीं औंढयांत । विसोबा खेचर नामें संत ।
सद्‌गुरू मानूनि तयाप्रत । हो शरणांगत नामदेवा ॥

असें सांगून औंढया नागनाथास पाठवून दिलें. विसोबा खेचरांनीं नामदेवांन
आपलें साक्षत्व फार मार्मिक रीतीनें पटवून देऊन नामदेवांचा,

जाऊनि सर्वहि लया मनिचा विरोध ॥
झाला तया सगुणनिर्गुणतत्वबोध ॥

येथें मध्यम खंड संपविला. उत्तर खंडांत नामदेवांची स्त्री राजा
इनें परिसा भागवताची स्त्री कमळजाइजकडून मागून आणलेला परि
विषवत् समजून "निस्पृहपणानें अति दूर चंद्रभागेंत फेकिला." परंतु त्य
विषाचा सांसर्गिक दोष थोडासा लागलाच. एकीकडे राजाई नाराज झाल
व दुसरीकडे परिसा भागवत

जरि न देसी खला परिस माझा मला, निश्चयें मी तुझा प्राण घेतों ॥
करुनि किंवा स्वयें आत्महत्या जलिं, चंद्रभागेंत घेतों समाधि ॥

असा तऱ्हेचा त्रागा करून भगवा देऊं लागला. नामदेव असे थोडेच घाबरणार ! त्यांनी चंद्रभागातटाकीं परिसा भागवताला नेलें व चंद्रभागेला परिस मागून पाण्यांतील मूठभर खडे बाहेर काढले व त्यांतून आपला परीस निवडून घेण्यास परिसा भागवताला सांगितलें. तो पाहातो तों बाहेर काढलेले सर्व खडे परिसच होते. प्रत्यक्ष परिस निर्माण करणाराच भेटल्यावर दगडी परिसाची किंमत काय राहिली? परिसा भागवतास उपरति होऊन, तो लगेच

शिष्यभावें साष्टांग नमस्कारी । उलट त्यातें तें नामदेव वारी ॥
विप्र असुनी कां करिसि वंदनातें ? । पूज्य भावाचें असे तुझें नातें ॥

पुढें परिसा भागवताला उपदेश देऊन नामदेव त्याचेसह औंढया नागनाथास आले व मंदिरांत कीर्तन सुरू केलें. नामदेव जातीनें शूद्र. शूद्रानें कीर्तन करणें म्हणजे अगदीं 'अब्रम्हण्य.' त्यामुळें औंढयां गांवचा ब्रह्मवृंद खवळला व देवापुढें कीर्तनाला त्यांनीं मनाई केली. आमचे नामदेवबोवा म्हणजे " आम्हीं विष्णूदास लोण्याहुनी मऊ " ब्राह्मणांचा राग न करितां त्यांना गौरवून तेथून आपले चंबुगवाळें उचललें व देवळाच्या पार्श्वभागीं उभें राहून कीर्तन पुरें करूं लागले. यामुळें ब्राह्मणाचें समाधान झालें खरें परंतु संताचा झालेला हा उपमर्द आमच्या चंद्रमौळी मोळ्या शंकरांना कसा रुचणार? त्यांनीं लगेच सबंध देऊळ "फिरवूनि नवलचि दाखविलें." याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला व नामदेव हे एक मोठे संत आहेत अशी ब्रह्मवृंदाची खात्री होऊन सर्वजण नामदेवांना शरण गेले.

याप्रमाणें नामदेव चरित्रांतील कांहीं ठळक ठळक प्रसंग घेऊन हें काव्यमय ल्हानसें प्रेमळ चरित्र पूर्ण केलें आहे. शेवटीं नामदेवांची आरती दिली आहे. त्यांतही वरील ३ खंडांतील प्रसंग ३ कडव्यांत मोठ्या खुबीनें गोविले आहेत.

काव्यकर्ते ह॰ भ. प. देवीदास यांची महाराष्ट्रीयांना फारशी ओळख नाहीं. ते चांगल्या श्रेष्ठ दर्ज्याचे कवि आहेत असें त्यांच्या काव्यावरून दिसून येतें

त्यांच्या कवनांत प्रेम आहे. त्यांच्या आर्या व श्लोक वाचून कविशिरोमणी मोरोपंत व सुश्लोकी वामन यांची आठवण होते. त्यांची पदें ही फार प्रेमळ आहेत. त्यांनी नामदेवांच्या तोंडी प्रसंगानुसार घातलेले देवाचे धावे (पद २, ४० ४४, ४६,) करुण रसानें थबथबले आहेत. यावनीभाषेवरही त्यांचें स्वामित्व फार चांगलें आहे असें त्या भाषेतील पदावरून दिसून येतें. बहुतेक पदें भारदस्त पण सोपी आहेत, अनुप्रास साधण्याच्या प्रयत्नांत क्लिष्टता आलेलें पद्य नं १७ (खंड २) सारखे एखाददुसरेंच आढळतें परंतु त्यांतील अर्थस्वारस्यानें मनाला फार आनंद होतो. क्वचित प्रसंगी ऱ्हस्व दीर्घांचा विपर्यास व मात्रादोष आहेत. पण ते फारच थोडे आहेत. कवींच्या स्वैर हक्कांचा उपयोग बहुतेक केला नाहीं म्हटलें तरी चालेल. एकंदरींत सर्व काव्य हृदयंगम आहे. साईलीलेच्या वाचकांनीं हें काव्यमय चरित्र अवश्य वाचावें अशी आम्ही शिफारस करितों.

पोंच व अभिप्राय:—म्युचुअल हेल्पिंग सोसायटीचा प्रथम वार्षिक रिपोर्ट (ता. १४-१-२४ ते ता. ३१-१२-२४) मुंबई शहरांत अगर बाहेरगांवच्या लोकास फंडाच्या मानानें ज्ञातीभेद न पाहतां कोणाही गृहस्थास कोणत्याही प्रकारची मदत करण्याकरितां ही सोसायटी स्थापन झाली आहे. उद्देश स्तुत्य आहे. फंड चांगला जमल्यास सोसायटीच्या पुढें कार्यक्षेत्र पुष्कळ मोठें आहे. गरीब लोकांना सोसायटीचा फार फायदा होईल यांत शंका नाहीं. सोसायटीचा पत्ता ३२ चर्नीरोड, गिरगांव, मुंबई. जनतेच्या मदतीनें सोसायटी लवकरच भरभराटीस येईल अशी आशा आहे.

## अध्याय २८ वा.

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीगुरुभ्यो नमः ।।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।।
।। श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ।।

साई नव्हे एक देशी । साई सर्वभूतनिवासी ।।
आब्रह्म कीटक मुंगी माशी । व्यापक सर्वांशीं सर्वत्र ।। १ ।।
साई शब्दब्रह्मीं पूर्ण । दावी परब्रह्मीची खूण ।।
ऐसा उभयभागीं प्रवीण । तेणेंच सद्गुरुपण तयातें ।। २ ।।
स्वयें मोठा ज्ञानी गहन । करूं नेणें शिष्यप्रबोधन ।।
अथवा निज स्वरूपावस्थान । त्याचें सद्गुरुपण तयाला ।। ३ ।।
पिता देई देहासि जनन । जननापाठीं लागे मरण ।।
गुरु निर्दाळी जनन मरण । तें कनवाळुपण आणीक ।। ४ ।।
आतां पूर्वील अनुसंधान । कीजे स्वप्नाध्याय श्रवण ।।
कैसें भक्तांचे स्वप्नीं जाऊन । बाबा दर्शन त्यां देत ।। ५ ।।
कोणास म्हणत त्रिशूल काढी । कोणापाशीं मागत खिचडी ।।
कोणास घेऊन हातीं छडी । पाठ ते फोडीत गुरुमिषें ।। ६ ।।
कोणास स्वप्नीं जाऊन भेवंडी[1] । सुरापानादि मोडीत खोडी ।।
टाळूनि भक्तांचीं अनेक सांकडीं । लावीत गोडी निजपदीं ।। ७ ।।

---

१ भिववी.

कैसी कोणाची पाठ फोडिली । वरवंट्यानें छाती ठेंचिली ॥
दशमोध्यायीं वार्ता हे कथिली । श्रोतां आकर्णिली आधींच ॥ ८ ॥
पुढील कथेची अपूर्वाई । धन्य परिसेता धन्य जो गाई ॥
दोघे समरसती ठायींचे ठायीं । सौख्य अनपायी लाधती ॥ ९ ॥
असत्कथा निंदादि श्रवण । या पापांचें होईल क्षालण ॥
करूं संतकथानुवादन । परम पावन जें सदां ॥ १० ॥
आतां तेच कथानिरूपण । श्रोतां सादर कीजे श्रवण ॥
पदोपदीं येईल दिसून । कृपाळूपण साईचें ॥ ११ ॥
राली बंधू ग्रीक व्यापारी । खरीदी सर्व हिंदुस्थानभरी ॥
पेढचा तयांच्या शहरोंशहरीं । मुंबा नगरींही एक ॥ १२ ॥
तेथील अधिकाऱ्यांचे पदरीं । सांप्रत लखमीचंदासी नोकरी ॥
अति विश्वासू आज्ञाधारी । काम करित मुनशीचें ॥ १३ ॥
रेलवे खात्यांत आरंभीं होते । व्यंकटेश मुद्रणागारीं मागुते ॥
तेव्हांच साईच्या समागमातें । लाधले कैसें तें परिसा ॥ १४ ॥
माझा माणूस देशावर । असो का हजारों कोस दूर ॥
आणीन जैसें चिडीचें पोर । बांधून दोर पायास ॥ १५ ॥
ऐसें बाबा कितीदां वदले । जनां लोकांही बहूतीं ऐकिलें ॥
अनुभवाही तैसेंच आलें । कथितों त्या लीलेस बाबांच्या ॥ १६ ॥
नेलीं ऐसीं पोरें कितीक । देशोदेशींचीं शिरडीस अनेक ॥
त्यांतीलचि लखमीचंद एक । पोर हें भाविक बाबांचें ॥ १७ ॥
जेव्हां बहुजन्म संपादित । प्राक्तन कर्म उदया येत ॥
तेव्हांच संतसमागम लाभत । मोहजनित तम नाशे ॥ १८ ॥
विवेकाग्नी होई प्रदीप्त । भाग्योदया वैराग्य पावत ॥
संचित कर्म क्षया जात । होत जीवितसाफल्य ॥ १९ ॥

१ ऐकणारा, २ अक्षय्य.

दिठी भरतां साईनाथ । दुजिया न लभे वाव तींत ॥
तेही असोत नयननिमीलत । साईनाथ चौपासीं ॥ २० ॥
झाली लालाजींची भेटी । कथिल्या त्यांनीं ज्या स्वानुभव गोष्टी ॥
प्रेमें साठविल्या हृदयसंपुटीं । उत्कंठा पोटीं त्या सांगूं ॥ २१ ॥
धरंणें[1] आलें तयास देख । तीही लीला अलौकीक ॥
काना मना करून एक । श्रोते भाविक परिसोत ॥ २२ ॥
सन एकोणीससें दहा । नाताळामधील दिवस पहा ॥
शिरडी प्रयाणयोग तेव्हां । लाधला हा लालाजीतें ॥ २३ ॥
तेव्हांच प्रथम प्रत्यक्ष दर्शन । परी हा योग येण्याचें चिन्ह ॥
एकांदों महिन्यांचें आधींच जाण । आलें घडून तें ऐका ॥२४॥
शांताक्रूझगांवीं असतां । ध्यानीं मनीं कांहींही नसतां ॥
स्वप्न पडलें तयास अवचिता । नवल दृष्टांता देखिलें ॥ २५ ॥
म्हातारा एक दाढीवाला । साधू भक्तवृंदीं वेढिला ॥
ऐसा महात्मा उभा देखिला । तो अभिवंदिला सप्रेम ॥ २६ ॥
पुढें दत्तात्रय मंजूनाथ । बिजूर उपनांवाचे गृहस्थ ॥
आले लखमीचंद तेथें । कीर्तनार्थ गुणदासाच्या ॥ २७ ॥
दासगणूची नित्य पद्धती । समोर बाबांची छबी मांडिती ॥
ती देखतांच लखमीचंदाप्रती । आठवली मूर्ती स्वप्नींची ॥ २८ ॥
तीच दाढी तेंच वय । तेच अवयव तेच पाय ॥
लखमीचंदाचा लागला लय । कीं तोच हा होय महात्मा ॥ २९ ॥
आधींच तें दासगणूचें कीर्तन । त्यांत तुकारामाचें आख्यान ॥
वरी त्या स्वप्नींच्या साधूचें दर्शन । लालाजी तल्लीन बहु झाले ॥ ३० ॥
लखमीचंद मनाचे कोमळ । डोळीं आलें प्रेमाश्रु जळ ॥
लागून राहिली जीवास तळमळ । मूर्ती ही प्रेमळ देखेन कैं[2] ॥ ३१ ॥

१ साईबाबांचें धरणें. २ कधीं.

आधी जी देखिली स्वप्नांतीं । प्रतिभा जियेची कीर्तनांतीं ॥
तिकडेच लागली अंतर्वृत्ति । आणीक चित्तीं येईना ॥ ३२ ॥
भेटेल काय कोणी स्नेही । जो मज शिरडीची सोबत देई ॥
कधीं मी प्रत्यक्ष या संतापायीं । वाटलें डोई ठेवीन ही ॥ ३३ ॥
होईल या साधूचें दर्शन कदा । भोगीन काय त्या प्रेमानंदा ॥
ऐसी उत्सुकता लखमीचंदा । लागून सदा राहिली ॥ ३४ ॥
लाविली पाहिजे खर्चाची सोय । आतां पुढें करावें काय ॥
दर्शन सत्वर कैसें होय । लागे उपाय शोधाया ॥ ३५ ॥
देव सदा भावाचा भुकेला । पहा कैसा चमत्कार घडला ॥
तेच रात्रीं आठाचे समयाला । दरवाजा ठोठावला स्नेह्यानें ॥ ३६ ॥
मग दार उघडून जों पाही । तों शंकरराव तयांचा स्नेही ॥
पुसे लखमीचंदास पाही । येतां काई शिरडीस ॥ ३७ ॥
केडगांवीं जाण्याचा मानस । नारायणमहाराज दर्शनास ॥
होता परी आलें मनास । आधीं शिरडीस जावें कीं ॥ ३८ ॥
करावें यत्प्रीत्यर्थ सायास । तेंच जें चालून येई अप्रयास ॥
पारावार न आनंदास ॥ मनास लखमीचंदाचे ॥ ३९ ॥
घेतली चुलतभावांपासुनी । रकम पंधरा रुपये उसनी ॥
शंकररावांनींही तैसेंच करूनि । केली प्रयाणीं सिद्धता ॥ ४० ॥
बिस्तरा बिछायत घेतली । निघावयाची तयारी केली ॥
जाऊन वेळीं तिकीटें मिळविलीं । गाडी साधिली उभयांनीं ॥ ४१ ॥
शंकरराव मोठे भजनी । गाडींत भजन केलें उभयांनीं ॥
लखमीचंद चौकसपणीं । करी रस्त्यानीं चौकशी ॥ ४२ ॥
शिरडीकडील कोणी जन । भेटतां करावें तयांस नमन ॥
सांगा साईबाबांचें महिमान । अनुभव प्रमाण अम्हालां ॥ ४३ ॥

१ हुबेहूब नक्कल.

साईबाबा मोठे संत । नगरबाजूस अति विख्यात ॥
म्हणती तयांची कांहीं प्रचीत । आम्हांसि निश्चित नव्हती ॥ ४४ ॥
डब्यांत चार मुसलमान । शिरडीनिकट ज्यांचें स्थान ॥
परस्पर वार्ता वर्तमान । करितां समाधान वाटलें ॥ ४५ ॥
साईबाबांची कांहीं माहिती । असल्यास निवेदा आम्हाप्रती ॥
लखमीचंद अति भावार्थी । तयांस पुसती प्रीतीनें ॥ ४६ ॥
साईबाबा महान संत । शिरडींत बहुत वर्षे नांदत ॥
असे महान अवलिया महंत । प्रत्युत्तर देत ते तयां ॥ ४७ ॥
येणेंप्रमाणें बोलतां चालतां । आनंदानें मार्ग क्रमतां ॥
दोघे कोपरगावांस येतां । आठवलें चित्ता शेटीच्या ॥ ४८ ॥
साईबाबांस पेरूची प्रीती । कोपरगांवीं पेरू पिकती ॥
म्हणती गोदेच्या काठीं विकती । समर्पू येतील बाबांस ॥ ४९ ॥
परी येतां गोदावरी काठीं । देखावा पाहून हर्षले पोटीं ॥
तांगा पोहोंचला पैल तटीं । विसरले गोष्टी पेरूची ॥ ५० ॥
तेथून शिरडी चार गांव । तांगा निघाला भरधांव ॥
लखमीचंदास झाला आठव । जेथें न ठाव पेरूचा ॥ ५१ ॥
तों एक म्हातारी डोईवर पाटी । धांवतां देखिली गाडीच्या पाठीं ॥
थांबविली गाडी तियेसाठीं । पेरूच भेटीस आले कीं ॥ ५२ ॥
लखमीचंद आनंदभरित । निवडून निवडून पेरू घेत ॥
राहिले पाटींत ते म्हातारी म्हणत । अर्पा मजप्रीत्यर्थ बाबांना ॥५३॥
पेरूची स्मृती आणि विस्मृती । म्हातारीची गांठ अवचिती ॥
तिची ती पाहून साईभक्ति । दोघेही चित्तीं विस्मित ॥ ५४ ॥
आरंभीं म्हातारा दिसला स्वप्नीं । तोच पुढें आढळला कीर्तनीं ॥
त्याचीच ही म्हातारी नसेलना कोणी । लालाजी मनीं तरकले॥५५॥

असो मग पुढें गाडी हांकिली । बोलतां बोलतां शिरडी गाठली ॥
दुरून मशिदीचीं निशाणें देखिलीं ॥ भावें वंदिलीं उभयतांनीं ॥५६॥

मग ते पूजासंभारेसी । गेले तात्काळ मशीदीसी ॥
घेऊनि साईदर्शनासी । आनंद चित्तेंसीं ते धाले ॥ ५७ ॥

आंगणाचें द्वारांतून । सभामंडपीं प्रवेशून ॥
पाहोनि बाबांची मूर्ती दुरून । सद्गद मन जाहलें ॥ ५८ ॥

होतां इच्छित मूर्तीचें दर्शन । लखमीचंद जाहला तल्लीन ॥
विसरून गेला भूक तहान । स्वानंद जीवन लाधला ॥ ५९ ॥

हातीं घेऊन निर्मळ जळ । प्रक्षाळिलें चरणकमळ ॥
अर्घ्यपाद्यादि पूजा सकळ । केळीं श्रीफळ अर्पिलें ॥ ६० ॥

धूप दीप तांबूल दक्षणा । केली मानसप्रदक्षिणा ॥
करोनि पुष्पहार समर्पणा । बैसले चरणासन्निध ॥ ६१ ॥

भक्त प्रेमळ लखमीचंद । तयासही गुरुकृपेचा आनंद ॥
पावूनि साई चरणारविंद । रमला मिलिंद जैसा तो ॥ ६२ ॥

---

१ अशीच एक आणखी गोष्ट. शिर्डीस रामलाल नांवाचा पंजाबी ब्राह्मण असे. तो मुंबईस असतांना त्याच्या स्वप्नांत महाराज आले व म्हणाले माझ्याकडे ये. त्याला महाराजांचें दर्शन कधींही घडलें नव्हतें व त्यानें फोटोही पाहिला नव्हता. तेव्हां हे स्वप्नांत आलेले महाराज कोण, हें त्याला ओळखतां येईना. दुसरे दिवशीं रस्त्यानें जातांना त्याला एका दुकानांत महाराजांचा फोटो दिसला. त्यानें दुकानदाराला विचारिलें "हा फोटो कोणाचा आहे व हे महाराज कुठें असतात." दुकानदारानें सर्व हकीगत सांगितली व रामलाल शिर्डीस गेला व तेव्हांपासून तो महाराजांचे देहावसानापर्यंत तेथेंच राहिला.

तेव्हां बाबा झाले वदते । "साले स्वप्नेमें भजन करते ॥
और दूसरे आदमीकू पुछते । क्या दूसरेसे पूछना ॥ ६३ ॥
सबकुच आपने आखोंसे देखना । कायकू दुसरे आदमीकू पूछना ॥
झूटा है क्या सच्चा सपना । करलो आपना बिचार आप ॥ ६४ ॥
मारवाडीसे लेकर उछिंती । क्या जरूर दर्शनकी होती ॥
होई क्या अब मुराद पुरती " । आश्चर्य चित्तीं परिसतां ॥ ६५ ॥
आपण मार्गात केली चौकशी । बाबांस येथें ती कळली कशी ।
हेंच आश्चर्य परम मानसीं । लखमीचंदासीं वाटलें ॥ ६६ ॥
घरीं आपणा पडलें स्वप्न । गाडींत आपण केलें भजन ॥
कळलें कैसें बाबांस वर्तमान । काय अंतर्ज्ञान हें ॥ ६७ ॥
होती दर्शनाची उत्कंठा । होता खरेंच पैशाचा तोटा ॥
उसनें घेऊन केला पुरवठा । तेंही पडा ठाऊक यां ॥ ६८ ॥
आश्चर्य परम लखमीचंदा । आश्चर्य सकल भक्तवृंदा ॥
आश्चर्य सत्पदपंकजमिलिंदा । अतर्क्य विंदान बाबांचें ॥ ६९ ॥
काढोनि ऋण करणें सण । अथवा यात्रा पर्यटण ॥
नावडे बाबांस कर्जबाजारीपण । शिकवण ही मुख्य येथील ॥ ७० ॥
असो तें सकळ भक्तांसमवेत । हेही साठ्यांचे वाड्यांत जात ॥
दुपार भरतां जेवाव्या बैसत । आनंदभरित मानसें ॥ ७१ ॥
इतुक्यांत बाबांचा प्रसाद म्हणून । कोणा भक्तानें सांजा आणून ॥
वाढिला थोडा पानांवरून । तृप्त तो सेवून जाहलें ॥ ७२ ॥
दुसरें दिवशीं भोजनसमयीं । झाली लालाजीस सांज्याची सई ॥
परी तो कांहीं नित्याचा नाहीं । उत्सुकता राहिली मनांत ॥ ७३ ॥
मग तिसरें दिवसाची नवाई । उरल्या वासनेची भरपाई ॥
करून देती महाराज साई । कैसिया उपायीं अवलोका ॥ ७४ ॥

१ स्वप्न. २ उसनें. ३ मनाची हौस.

गंधाक्षतादिपुष्पांसमेत । घंटा नीरांजन पंचारत ॥
घेऊनि जोग मशीदीं येत । पुसं लागत बाबांसीं ॥ ७५ ॥
'काय आणावा नैवेद्य आज' । आज्ञा करिती महाराज ॥
सांजा ताटभर घेऊन ये मज । आरतीपूजन मग करी ॥ ७६ ॥
ठेवूनि तेथेंच पूजासंभारा । जोग तात्काळ गेले माघारा ॥
परतले सवें घेऊनि शिरा । सवा पुरा अविलंबें ॥ ७७ ॥
पुढें झाली दुपारची आरती । आधींच आणिले नैवेद्य भक्तीं ॥
ताटें येऊं लागलीं वरती । बाबा तैं वदती निजभक्तां ॥ ७८ ॥
आहे आजिचा दिवस बरवा । वाटे सांज्याचा प्रसाद व्हावा ॥
आणवा म्हणती सत्वर मागवा । सकळांनीं सेवावा यथेष्ट ॥ ७९ ॥
मग भक्तांनीं जाऊन आणिली । सांज्याची दोन बगोणीं भरलीं ॥
लखमीचंदासीं भूकही लागली ॥ पाठही भरली होती पैं ॥ ८०
पोटांत भूक पाठीस कणकण । तेणें लखमीचंद अस्वस्थमन ॥
बाबांच्या मुखीं तैं येई जें वचन । श्रोतीं अवधान देईजे ॥ ८१ ॥
"भूक लगी है अच्छा हूवा। कमरमे दर्द चाहिये दवा ॥
अब सांजेकी चली है हवा । करो सवार आरती" ॥ ८२ ॥
जें जें लखमीचंदाचें मनीं । तें तें परिस्फुट बाबांचे वचनीं ॥
शब्दावीण प्रतिध्वनी । अंतर्ज्ञानी महाराज ॥ ८३ ॥
असो पूर्ण होतां आरती । सांजा मिळाला भोजनवक्तीं ॥
पुरली लखमीचंदाची आसक्ती । आनंद चित्तीं जाहला ॥ ८४ ॥
तेथून बाबांवर जडलें प्रेम । उदबत्ती नारळ माळेचा नेम ॥
लखमीचंदही लाधले क्षेम । पूजा उपक्रम चालला ॥ ८५ ॥
जडली एवढी साईवर भक्ति । जाणारा लाधतां शिरडीप्रति ॥
माळ दक्षिणा कापूर उदबत्ती । तया हातीं पाठवीत ८६ ॥

१ तयार.

कोणीही जावो शिरडीप्रती । लखमीचंदास लागतां माहिती ॥
या तीन वस्तु दक्षिणासमवेती । बाबांस पाठविती नेमानें ॥ ८७ ॥
त्याच खेपेस चावडीचे निशीं । समारंभ तो पहावयासी ॥
जातां बाबास उठली खोकशी । कासावीसी जाहली ॥ ८८ ॥
लखमीचंद मनीं म्हणत । काय ही खाशी त्रास देत ॥
वाटे लोकांची दृष्ट लागत । खोकला उठत ते पायीं ॥ ८९ ॥
ही तो केवळ मनाची वृत्ति । उठली लखमीचंदाचे चित्तीं ॥
येतां सकाळीं मशीदीप्रती । बाबाही अनुवदती नवल पहा ॥ ९० ॥
येतां माधवराव तयांप्रती । आपण होऊनि बाबा वदती ॥
काल झाला मज खोकला अती । ही काय कृती दृष्टीची ॥ ९१ ॥
वाटे मज कोणाची तरी । दृष्टचि लागली आहे खरी ॥
तेणें हा खोकला परोपरी । करी बेजारी जीवाची ॥ ९२ ॥
आश्चर्य लखमीचंदाचे अंतरीं । हीतों अनुवृत्ती आपुलीच खरी ॥
कैसें हें बाबास कळलें तरी । सर्वां अंतरीं वसती कीं ॥ ९३ ॥
मगतो विनवी कर जोडूनी । बहु आनंदलों अपुलें दर्शनीं ॥
तरी ऐसीच कृपा करोनी । महाराजांनीं रक्षावें ॥ ९४ ॥
आतां मज या पायांवाचुनी । देवचि नाहीं आणिक जनीं ॥
मन हें रमो आपुले भजनीं । अपुलेच चरणीं सर्वदा ॥ ९५ ॥
म्हणे चरणीं ठेवितों माथा । निरोप मागतों साईसमर्था ॥
आज्ञा असावी आम्हा आतां । असेच अनाथा सांभाळा ॥ ९६ ॥
असावी नित्य कृपादृष्टि । जेणें न होऊं संसारीं कष्टी ॥
लाधो तव नाम संकीर्तन पुष्टी । सुखसंतुष्टी सर्वथा ॥ ९७ ॥
घेऊनि उदी सं आशिर्वाद । पावोनि स्नेह्यांसहित आनंद ॥
मार्गीं गात साईगुणानुवाद । लखमीचंद परतला ॥ ९८ ॥

१ खोकला. २ आशिर्वादासह.

ऐसीच आणीक दुसरी चिठी । बांधून बाबांनीं आणिली शिरडी ॥
जेथें प्रत्यक्ष दर्शनाची घडी । नवलपरवडी परिसा ती ॥ ९९ ॥
चिठी ती एक प्रेमळ बाई ॥ तिनिया कथेची परम नवलाई ॥
ब्रह्माणपुरीं दृष्टांत होई । महाराज साई पाही ती ॥ १०० ॥
कधींही नव्हतें प्रत्यक्ष दर्शन । तरी त्या बाईस जाहलें स्वप्न ॥
बाबा तियेच्या द्वारीं येऊन । खिचडी भोजन मागती ॥ १०१ ॥
बाई तात्काळ होऊन जागी । पाही तो नाहीं कोणीही जागीं ॥
दृष्टांत कथिला लागवेगीं । समस्तालागीं तियेनें ॥ १०२ ॥
पती तियेचा तेच शहरीं । तेथील टपालखात्याचे अधिकारी ॥
पुढें अकोल्यास बदलल्यावरी । केली तयारी शिरडीची ॥ १०३ ॥
दंपत्य होतें मोठें भावीक । जाहलें साईदर्शनकामुक ॥
वाटलें दृष्टांताचें कौतुक । माया अलौकिक साईची ॥ १०४ ॥
पुढें सोईचा पाहुनि दिन । निघालीं दोघें शिरडी लक्षून ॥
मार्गांत गोमती तीर्थ वंदून । शिरडीलागून पातलीं ॥ १०५ ॥
प्रेमें घेऊनि बाबांचें दर्शन । करूनिया भावें पूजन ॥
नित्य बाबांचे चरण सेवून । सुखसंपन्न जाहले ॥ १०६ ॥
ऐसें तें दंपत्य आनंदमनें । राहिलें शिरडींत दोन महिने ॥
बाबाही तुष्टले खिचडीभोजनें । भावभक्तीनें तयांच्या ॥ १०७ ॥
खिचडी नैवेद्य समर्पणार्थ । दंपत्य आलें शिरडीप्रत ॥
चतुर्दशदिन होतां ही गत । खिचडी अनिवेदित[1] तैशीच ॥ १०८ ॥
कृतसंकल्प दीर्घसूत्रता । नावडे ती बाईचे चित्ता ॥
पंधरावे दिवशीं माध्यान्ह भरतां । खिचडीसमवेत पातली ॥ १०९ ॥
होते तेव्हां पडदे सोडिले । घेऊन समवेत भक्त आपुले ॥
बाबा आधींच भोजनीं बैसले । ऐसें समजलें बाईस ॥ ११० ॥

१ नैवेद्य होणें राहिला.

ऐसें भोजन चालते समयीं । पडद्याचे आंत कोणी न जाई ॥
परी त्या बाईस जाहली घाई । खोलीं न राही ती उगली ॥ १११ ॥
केवळ खिचडी निवेदनोल्हासा । अकोल्याहून शिरडीचे प्रवासा ॥
अंगिकारी जी तियेचा धिंवसा । राहील कैसा अपूर्ण ॥ ११२ ॥
कोणाचेंही कांहीं न मानितां । पडदा स्वहस्तें सारून परता ॥
करूनि निजप्रवेश निजसत्ता । कामनापूर्तता साधिली ॥ ११३ ॥
तेव्हां बाबांनीं नवल केलें । खिचडीलागीं इतुके भुकेले ॥
कीं तीच आधीं मागूं सरले । ताटचि धरिलें दों हातीं ॥ ११४ ॥
खिचडी पाहून जाहला उल्हास । उचलूनिया घासावर घास ॥
बाबांनीं सूदिले निजमुखास । कौतुक समस्तांस वाटलें ॥ ११५ ॥
पाहूनि बाबांची ती आतुरता । विस्मय दाटला सर्वांचे चित्ता ॥
खिचडीची कथा परिसतां । वाटली अलौकिकता साईची ॥ ११६ ॥
आतां येथून पुढील कथा । ऐकतां प्रेम दाटेल चित्ता ॥
एक गुजराती ब्राह्मण सेवेकरितां । आला अवचितां शिरडीस ॥ ११७ ॥
रावबहादुर साठ्यांचे पदरीं । आरंभीं केली जयानें चाकरी ॥
तया शुद्ध सेवाभ्यंतरीं । लाधली पायरी बाबांची ॥ ११८ ॥
तीही कथा बहुत गोड । जयासी भक्तिप्रेमाची आवड ॥
कैसें श्रीहरी पुरवी कोड । मनाची होड तें परिसा ॥ ११९ ॥
मेघा तयाचें नामाभिधान । साई सर्वें ऋणानुबंधन ॥
तेणें तो पावला शिरडी स्थान । कथानुसंधान तत्पर व्हा ॥ १२० ॥
साठे खेड्याजिल्ह्याचे प्रांत । तेथें हा मेघा भेटला अवचित ॥
ठेविला तयास तैनातींत । शिवालयीं नित्य पूजेस ॥ १२१ ॥

---

१ अंगणांत, सभामंडपांत. २ उगाच. ३ उत्कंठा. ४ कोणाची परवानगी न घेतां. ५ हरि विनायक साठे.

पुढें हे साठे[1] शिरडीस आले । तेंच तयांचें भाग्य उदेलें ॥
तेथें महाराज साई जोडले । चित्त जडलें तच्चरणीं ॥ १२२ ॥
यात्रेकऱ्यांचा पाहूनि रगडा । झाला तयांचे मनाचा धडा ॥
असावा येथें आपुला वाडा । सोय बिऱ्हाडां लागेल ॥ १२३ ॥
मग पटारी ग्रामस्थ मिळविले । तया जागेचें संपादन केलें ॥
जेथें बाबा आरंभीं प्रगटले । वाड्याचें ठरविलें तें स्थळ ॥ १२४ ॥
या पवित्र जागेचें महिमन । चतुर्थाध्यायींच पूर्ववर्णन ॥
द्विरुक्तीचें नाहीं प्रयोजन । चालवूं निरुपण पुढारा ॥ १२५ ॥
असें मेघाचें संचित मोठें । लाधले रावबहादुर साठे ॥
तेव्हांच तो लागला परमार्थवाटे । नेटें पाटें तयांच्या ॥ १२६ ॥
परिस्थितीस होऊनि वश । पावला होता कर्मभ्रंश ॥
तयास देऊनि गायत्र्युपदेश । करविला प्रवेश सन्मार्गीं ॥ १२७ ॥
मेघा साठ्यांचे सेवेस लागला । परस्परांशीं आदर वाढला ॥
गुरूच मेघा भावी साठ्यांला । लोभही जडला तयांचा ॥ १२८ ॥
असो एकदां सहज बोलतां । निजगुरूचें महात्म्य वानितां ॥
प्रेम दाटलें साठ्यांचे चित्ता । मेघास सादरता पूसती ॥ १२९ ॥
बाबांस घालावें गंगोदकस्नान । इच्छा ही माझी मनापासून ॥
तदर्थ तुज शिरडीलागून । पाठवितों जाण मुख्यत्वें ॥ १३० ॥
शिवाय तुझी अनन्य सेवा । पाहूनि वाटे माझिया जीवा ॥
सद्गुरूचा तुज संगम घडावा । पायीं जडावा तव भाव ॥ १३१ ॥
सार्थक होईल तव देहाचें । परम कल्याण या जन्माचें ॥
जा जा काया मनें वाचे । लागे सद्गुरूचे पायांस ॥ १३२ ॥

१ एक प्रांत ऑफिसर.

मेघा पुसे तयांची जात । वस्तुतः साठ्यांसही ती अज्ञात ॥
म्हणती कोणी अविंधही वदत । बैसती मशीदींत म्हणवूनी ॥ १३३ ॥
अविंध हा शब्द कानीं पडतां । जाहली मेघामनीं दुश्चित्तता ॥
नाहीं नीच यवनापरता । काय गुरुता तयाची ॥ १३४ ॥
नाहीं म्हणतां साठे क्षोभती । होय म्हणतां पावेन दुर्गती ॥
करावें काय चालेना मती । चिंतावर्तीं तो पडला ॥ १३५ ॥
इकडे आड तिकडे विहीर । दोलायमान मनीं अस्थिर ॥
परी साठ्यांचा आग्रह फार । केला निर्धार दर्शनाचा ॥ १३६ ॥
पुढें मेघा शिरडीस आला । मशीदीचे अंगणीं पातला ॥
पायरी जों चढूं लागला । बाबांनीं लीला आरंभिली ॥ १३७ ॥
उग्र स्वरूप धारण केलें । पाषाण हातीं घेऊन वदले ॥
खबरदार पायरीवर पाऊल ठेविलें । यवनें वसविलें हें स्थान ॥१३८॥
तूं तो ब्राह्मण उंच वर्ण । मी तो नीचाचा नीच यवन ॥
होईल विटाळ तुजलागून । जाई परतोन माघारा ॥ १३९ ॥
तें कातावलेपणाचें रूप । दुजें प्रळयरुद्राचें स्वरूप ॥
पहाणारांस होत थरकांप । चळी कांपत तंव मेघा ॥ १४० ॥
परी हा राग केवळ वरवर । अंतरीं दयेचा वाहे पूर ॥
मेघा थक्क विस्मयनिर्भर । कैसें मदंतर कळलें यां ॥ १४१ ॥
कोठें खेडा जिल्हा दूर । कोठें लांब अहमदनगर ॥
माझें विकल्पाकृष्ट अंतर । अविष्करण हें त्याचें ॥ १४२ ॥
बाबा जों जों मारूं धांवत । तों तों मेघाचें धैर्य खचत ॥
पाऊल एकेक मागेंच पडत । जावया न धजत पुढारा ॥ १४३ ॥
तैसाच कांहीं दिवस राहिला । बाबांचा रागरंग पाहिला ॥
शक्य ती सेवा करीत गेला । परी न पटला दृढ विश्वास ॥ १४४ ॥

पुढें मग तो घरासि गेला । ज्वरार्त झाला अंथरुणीं खिळला ॥
तेथें बाबांचा ध्यास लागला । परतोनि आला शिरडीस ॥ १४
तो जो आला तोच रमला । साईपायीं भाव जडला ॥
साईचा अनन्य भक्त जाहला । साईच त्याजला एक देव ॥ १४६
मेघा आधींच शंकरभक्त । होतां साईपदीं अनुरक्त ॥
शंकरचि भावी साईनाथ । तोच उमानाथ तयाचा ॥ १४७ ॥
करी मेघा अहर्निश । साई शंकर नामघोष ॥
बुद्धी ही तदाकार अशेष । चित्त किल्मिषविरहीत ॥ १४८ ॥
झाला साईचा अनन्य भक्त । साईस प्रत्यक्ष शंकर भावित ॥
शंकर शंकर मुखें गर्जत । अन्य दैवत मानीना ॥ १४९ ॥
साईच त्याचें देवतार्चन । साईच त्याचा गिरिजारमण ॥
येच दृष्टीचा ठाय घालून । नित्य प्रसन्नमन मेघा ॥ १५० ॥
शंकरास बेलाची आवड । शिरडींत नाहीं बेलाचें झाड ॥
मेघा तदर्थ क्रोस दीडकोस । जाऊनि निज चाड पुरवितसे ॥१५१॥
दीड कोसाचा काय पाड । बेलालागी लंघिता पहाड ॥
परी पूजेचें पुरविता कोड । फेडिता होड मनाची ॥ १५२ ॥
लांबलांबून बेल आणावा । पूजासंभार पूर्ण मिळवावा ॥
ग्रामदेवांचा अनुक्रम घ्यावा । सर्वांस वाहवा यथाविधी ॥ १५३ ॥
मग त्याच पावलीं जावें मशीदीं । मग वंदावी बाबांची गादी ॥
करूनिया पदसंवाहनादी । पदतीर्थ आधीं सेवी तो ॥ १५४ ॥
मेघाचिया आणिक कथा । आनंद होईल श्रवण करीतां ॥
ग्रामदेवांविषयीं आदरता । दिसेल व्यापकता साईची ॥ १५५ ॥
मेघा शिरडीस असेपर्यंत । दुपारची आरती करीतो नित ॥
परी आधीं ग्रामदेव समस्त । पूजून मशिदींत जात असे ॥ १५६ ॥

ऐसा तयाचा नित्यक्रम । एके दिसीं चुकला हा अनुक्रम ॥
खंडोबाच्या पूजेचा अतिक्रम । घडला परिश्रम करितांही ॥ १५७ ॥
पूजा कराया केला यत्न । द्वार नुघडे करितां प्रयत्न ॥
म्हणून ती पूजा तैसीच वगळून । आला तो घेऊन आरती ॥ १५८ ॥
तेव्हां बाबा वदती तयाला । पूजेंत त्वां आजला खंड पाडिला ॥
पूजा पावल्या सर्व देवाला ॥ एक राहिला पूजेविण ॥ १५९ ॥
जा ती करून मग ये येथें । मेघा वदे दार बंद होतें ॥
उघडूं जातां उघडेना तें । वगळणें पुजेतें भाग आलें ॥ १६० ॥
बाबा वदती जा तूं पाहे । दार आतां उघडें आहे ॥
मेघा तात्काळ जाय लवलाहे । अनुभवलाहो बोलाचा ॥ १६१ ॥
खंडेरायाची पूजा केली ॥ मेघाचीही मळमळ गेली ॥
पुढें बाबांनीं करूं दिधली । पूजा अपुली मेघाला ॥ १६२ ॥
मग गंध पुष्पादि अष्टोपचार । पूजा समर्पी अति सादर ॥
यथाशक्ति दक्षिणा हार । फलभारही अर्पितसे ॥ १६३ ॥
एकदां मकर संक्रांती दिनीं । गोदावरीचें आणून पाणी ॥
बाबास अभ्यंग चंदन चर्चुनी । घालावें मनीं स्नान आलें ॥१६४॥
आज्ञेलागो पिच्छा पुरवितां । इच्छेस येईल तें कर जा म्हणतां ॥
मेघा घागर घेऊनि तत्त्वतां । पाणियाकरितां निघाला ॥ १६५ ॥
आला न उदयाचलीं जों तरणी । मेघा निघे रिक्तकलशपाणी ॥
निरातपत्र अनवाणी । आणूं पाणी गोमतीसी ॥ १६६ ॥
जातां येतां आठ कोस । लागेल मार्ग क्रमावयास ॥
पडतील कष्ट आणि सायास । स्वप्नींही तयास येईना ॥ १६७ ॥
ही तो मेघास नाहीं चिंता । निघाला तो अनुज्ञा मिळतां ॥
असतां निश्चयाची दृढता । कार्योल्लासंता सर्वत्र ॥ १६८ ॥

गंगोदकें साईस स्नान। घालावें ऐसें होतां मन ॥
कैंचे सायास कैंचा शीण। एक प्रमाण दृढ श्रद्धा ॥ १६९ ॥
असो ऐसें तें पाणी आणिलें। ताम्र गंगाळगीं रिचविलें ॥
स्नानार्थ उठावें आग्रह चालले। परी न मानिलें बाबांनीं ॥ १७० ॥
माध्यान्हीची आरती झाली। मंडळी घरोघरीं निघोन गेली ॥
झाली स्नानाची तयारी सगळी। दुपार भरली मेघा वदे ॥ १७१ ॥
पाहूनि मेघा अत्याग्रही। मग तो साई लीला विग्रही ॥
कर मेघाचा निजकरांहीं। धरूनि पाही संबोधी ॥ १७२ ॥
नकोरे मज गंगास्नान। ऐसा कैसा तूं नादान ॥
किमर्थ मज फकीराकारण। गंगाजीवन मज काय ॥ १७३ ॥
परी मेघा तें कांहीं न ऐके। शंकरासम जो बाबांस लेखे ॥
गंगास्नानानें शंकर हरिखे। हें एकचि ठाउकें तयातें ॥ १७४ ॥
म्हणे बाबा आजिचा दिन। मकरसंक्रांतीचा सण ॥
गंगोदकें शंकर स्नपन। करितां सुप्रसन्न तो होई ॥ १७५ ॥
मग पाहूनि तयाचें प्रेम। आणि तयाचा अढळ नेम ॥
म्हणती पुरवी तुझाचि काम। शुद्धांतर्याम मेघाचें ॥ १७६ ॥
ऐसें म्हणून मग ते उठले। स्नानार्थ मांडिल्या पाटावर बसले ॥
मस्तक मेघापुढें ओढवलें। म्हणतीं इवलेंसें जळ घाली ॥ १७७ ॥
सकळ गात्रीं शिर प्रधान। करी तयावरी लवजळ सिंचन ॥
तें पूर्ण स्नान केलिया समान। हें तरी मानरे इतुकें ॥ १७८ ॥
बरें म्हणून कलश उचलिला। शिरीं ओततां प्रेमा जो दाटला ॥
हरगंगे म्हणून तो रिचविला। सबंध ओतिला अंगावर ॥ १७९ ॥
मेघास अत्यंत आनंद झाला। माझा शंकर सचैल न्हाणिला ॥
घडा रिता जैं खालीं ठेविला। पाहूं लागला नवल तो ॥ १८० ॥

सर्वांगीं जरी ओतिलें उदक । शिरचि तेवढें ओलें एक ॥
इतर अवयव सुके ठाक । वस्त्रींही टाक न जलाचा ॥ १८१ ॥

मेघा जाहला गलिताभिमान । निकटवर्ती विस्मयापन्न ॥
ऐसे भक्तांचे लाड आपण । पुरवीत संपूर्ण श्रीसाई ॥ १८२ ॥

तुझ्या मनीं घालावें स्नान । जा घाल तुझ्या इच्छेसमान ॥
त्यांतही माझ्या अंतरीची खूण । सहज जाण लाधसील ॥ १८३ ॥

हेंच साईभक्तीचें वर्म । व्हावा मात्र सुदैवें समागम ॥
मग तया कांही न दुर्गम । सर्वचि सुगम क्रमेंक्रमें ॥ १८४ ॥

बसतां उठतां वार्ता करितां । सकाळा दुपारा फेरिया फिरतां ॥
भक्त श्रद्धा स्थैर्य धरितां । ईप्सितार्था संपादी ॥ १८५ ॥

परी ऐसी कांही खूण । प्रत्यक्ष व्यवहारीं पटवून ॥
क्रमानुसार गोडी लावून । परमार्थाकलन तो करवी ॥ १८६ ॥

ऐसीच मेघाची आणीक कथा । सुखावतील श्रोते परिसतां ॥
भक्तप्रेम साईचें पहातां । आनंद चित्ता होईल ॥ १८७ ॥

बाबांची एक मोठी छबी । होती नानांनीं[1] जी दिधली नवी ॥
ती ही मेघा वाड्यांत ठेवी । पूजेस लावी भक्तीनें ॥ १८८ ॥

मशीदींत प्रत्यक्ष मूर्ती । वाड्यांत प्रतिमापूर्ण प्रतिकृती ॥
दोनी स्थळीं पूजा आरती । अहोरात्रीं चालली ॥ १८९ ॥

ऐसी सेवा होतां होतां । सहज बारा मास लोटतां ॥
मेघा पहाटे जागृत असतां । देखिलें दृष्टांता तयानें ॥ १९० ॥

असतां मेघा शेजेप्रती । जरी निमीलित नेत्रपाती ॥
अंतरीं असतां पूर्ण जागृती । पाहे स्पष्टाकृति बाबांची ॥ १९१ ॥

---

१ कै. रा. नानासाहेब चांदोरकर.

बाबाही जाणूनि तयाची जागृती । अक्षता टाकूनि बिछान्यावरती
मेघा त्रिशूल काढीरे म्हणती । गुप्त होती तेथेंच ॥ १९२ ॥

हे बाबांचे शब्द परिसता । डोळे उघडले अति उल्हासता ॥
पाहूनि बाबांची अंतर्धानता । बहु विस्मयता मेघास ॥ १९३ ॥

मेघ तंव पाही चोहोंकडे । तांदुळ शेजेवर जिकडेतिकडे ॥
वाड्याचीं पूर्ववत बंद कवाडें । पडलें तें कोडें तयास ॥ १९४ ॥

मशीदीस जाऊन तत्काळीं । बाबांचें दर्शन घेतेवेळीं ॥
मेघानें त्रिशूळकथा कथिली । आज्ञा मागितली त्रिशूळाची ॥ १९

दृष्टांत साद्यंत मेघानें कथिला । बाबा वदती दृष्टांत कसला ॥
शब्द नाहीं का माझा परिसिला । काढ म्हणितला त्रिशूळ तो ॥१९

दृष्टांत म्हणूनि माझे बोल । जातां काय कराया तोल ॥
बोल माझे अर्थ सखोल । नाहीं फोल अक्षरही ॥ १९७ ॥

मेघा म्हणे आपण जागविलें । ऐसेंच आरंभीं मजही वाटलें ॥
परी दार नव्हतें एकही खुलें । म्हणून मानिलें तें तैसें ॥ १९८ ॥

तयास बाबांचें ऐका उत्तर । " माझिया प्रवेशा नलगे दार ॥
नाहीं मज आकार ना विस्तार । वसें निरंतर सर्वत्र ॥ १९९ ॥

टाकूनिया मजवरी भार । मोनला जो मज साचार ॥
तयाचे सर्व शरीरव्यापार मी सूत्रधार चालवी ॥ २०० " ॥

असो पुढें नवल विंदान । त्रिशूळाचें प्रयोजन ॥
श्रोतां परिसिज सावधान । येईल अनुसंधान प्रत्यया ॥ २०२ ॥

येरीकडे मेघा जो परतला । त्रिशूळ काढावया आरंभ केला ॥
वाडियांत छबीनिकट भिंतीला । त्रिशूळ रेखाटिला रक्तवर्ण ॥ २०३

दुसरेच दिवशीं मशिदींत । आला पुण्याहून रामदास भक्त ॥
प्रेमें बाबांस नमस्कारित । लिंग अर्पीत शंकराचें ॥ २०४ ॥

इतक्यांत मेघाही तेथें आला । बाबांसीं साष्टांग प्रणाम केला ॥
बाबा म्हणती "हा शंकर आला"। सांभाळी याजला तूं आतां ॥२०५

ऐसें होतां लिंग प्राप्त । त्रिशूळ दृष्टांतापाठीं अवचित ॥
मेघा तटस्थ लिंगचि देखत । प्रेमें सद्गदित जाहाला ॥ २०६

आणीक पाहाया लिंगाचा अनुभव । काका साहेब दीक्षितांचा अपूर्व॥
श्रोतां सादर परिसिजे सर्व । जडेल भरंवसा साईपदीं ॥ २०७ ॥

येरीकडे जो लिंग घेउनी । निघे मेघा मशीदींतुनीं ॥
दीक्षित वाड्यांत स्नान सारुनी । नामस्मरणीं निमग्न ॥ २०८ ॥

धूतवस्त्रें अंग पुसून । शिळेवरी उभें राहून ॥
टुवाल डोईवर घेऊन । करीत स्मरण साईचें ॥ २०९ ॥

नित्यनेमा अनुसरून । शिरोभाग आच्छादून ॥
करीत असतां नामस्मरण । लिंगदर्शन जाहलें ॥ २१० ॥

चालले असतां नामस्मरण । आजचि कां व्हावें लिंगदर्शन
ऐसें जों दीक्षित विस्मयापन्न । मेघा सुप्रसन्न सन्मुख ॥ २११ ॥

म्हणे मेघा पहा काका । लिंग बाबांनीं दिधलें विलोका ॥
काका पावले सविस्मय हरिखा । लिंग विशेखा देखुनी ॥ २१२ ॥

रूपरेखा आकार लक्षणीं । आलें ध्यानीं जें पूर्वक्षणीं ॥
तेंच तें लिंग पाहून तत्क्षणीं । दीक्षित मनीं सुखावले ॥ २१३ ॥

असो पुढें मेघाचे हातून । त्रिशूळलेखन होऊन पूर्ण ॥
छबीसंन्निध लिंग स्थापन । साईनीं करवून घेतलें ॥ २१४ ॥

मेघास आवडे शंकरपूजन । करून शंकर लिंगप्रदान ॥
केलें तद्भक्तीचें दृढीकरण । नवलविंदान साईचें ॥ २१५ ॥

---

१ असेंच गणपती स्थापनेसंबंधें एका बाईस पडलेल्या स्वप्नाचें टिप्पण रा. रा. हरी सिताराम दीक्षित यांनी केलेलें आहे तें एणेंप्रमाणें:—

ऐसी काय एक कथा । सांगेन ऐशा अपरिमिता ॥
परी होईल ग्रंथविस्तारता । म्हणून श्रोतां क्षमा कीजे ॥ २१६ ॥
अथापि तुम्ही श्रवणोत्सुक । म्हणोन कथीन आणिक एक ॥
पुढील अध्यायीं साईचें कौतुक । याहून अलौकिक दिसेल ॥ २१७
होऊन हेमाड साईसी शरण । करवी साईचरित्र श्रवण ॥
होईल तेणें भवभयहरण । दुरितनिवारण सकळांचें ॥ २१८ ॥

इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थसच्चरिते । दृष्टांत कथनं नाम ॥
अष्टाविंशतितमोध्यायः संपूर्णः ॥

॥ श्री सद्गुरू साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

---

"एकदां मी शिर्डीस जातेवेळीं मोरेश्वरराव प्रधान मला बोरीबंदरा भेटावयास आले व सांताक्रुझला आपल्या घरीं गणपती बसवायचा क हें महाराजांस विचारावयास सांगितलें. मीं त्याप्रमाणें शिर्डीस गेल्या महाराजांस विचारिलें. महाराजांनीं "होय" म्हणून आज्ञा केली. ती आ कळविण्यासाठीं मी मोरेश्वररावांस पत्र लिहिलें व महाराजांना विचारून त्याच दिवशीं पोष्टांत टाकलें. त्याच रात्रीं पहाटेच्या सुमारास सांटाक्रुझ ये मोरेश्वररावांची मेहुणी तातीबाई इला स्वप्न पडलें व त्यांत एक कोनाड्य अति सुंदर गणपतीची मूर्ती बसलेली तिला दिसली. तिनें तें स्वप्न सका उठल्यावर घरांत सांगितलें व दुसरे दिवशीं महाराजांच्या आज्ञेचें पत्र येउ पोहोंचलें. अर्थात स्वप्नद्वारा महाराजांनीं अगाऊच सूचना दिली."

४८९

## आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनी रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

ग. अ. सराफ, नांदेड.

कविवर्य संत महिपतीबावा यांच्या धर्तीवर लिहिलेल्या ह. भ. परायण दास गणू महाराज यांच्या संतलीलामृत व भक्तलीलामृताच्या प्रती मिळण्याचें ठिकाणः—

गो. र. दाभोळकर.
५ सेंटमार्टिन्स रोड, वांद्रे.
बी. बी. सी. आय. रेल्वे.